अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १४७ । बुधवार ११ मार्च २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## महाराष्ट्रात ५ हजार ५०६ पदांसाठी मेगा प्राध्यापक भरती

पुणे : राज्यातील सरकारी आणि अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी एक आनंदाची बातमी आली आहे. राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत घोषणा केली की, महाराष्ट्रात लवकरच ५,००० हून अधिक प्राध्यापकांसाठी एक मोठी भरती मोहीम राबविली जाईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संपूर्ण भरती प्रक्रिया जून २०२६ पूर्वी पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. काँग्रेस सदस्य अभिजित वंजारी यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, महाराष्ट्रात ३१,१८५ मंजूर प्राध्यापक पदे आहेत. त्यापैकी १९,२६७ पदे भरण्यात आली आहेत. ११,९१८ रिक्त प्राध्यापक पदांपैकी ५,०१२ पदे भरतीसाठी मंजूर करण्यात आली आहेत, तर ४९४ पदे रिक्त आहेत. परिणामी, ५,५०० हून अधिक पदांसाठी भरतीला मान्यता देण्यात आली आहे.

### महत्त्वाचे..

### रेल्वेच्या कारवाईला उच्च न्यायालयाची अंतरिम स्थगिती

श्रीरामपूर : येथील एका भूखंडाबाबत रेल्वे प्रशासनाने सार्वजनिक जागा (अनधिकृत कब्जेपासून बेदखल करणे) कायदा, १९७१ (झझए अलीं) अंतर्गत सुरू केलेल्या कारवाईला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने अंतरिम स्थगिती दिली आहे. पुढील आदेशापर्यंत संबंधित मालमत्तेबाबत कोणतीही सक्तीची कारवाई किंवा निष्कासन प्रक्रिया करू नये, असे निर्देश न्यायमूर्ती विभा कंकणवाडी व न्यायमूर्ती हितेन एस. वेणेगावकर यांच्या खंडपीठाने दिले. श्रीरामपूर येथील भूधारक राजेश कासलीवाल यांनी रेल्वे प्रशासनाने दिलेल्या नोटिसांना आव्हान देत उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. याचिकेत संबंधित जमीन खासगी मालकीची असून रेल्वे प्रशासनाकडून 'पीपीई ॲक्ट' अंतर्गत करण्यात येणारी कारवाई बेकायदेशीर असल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणात याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. ए. एन. काकडे यांनी बाजू मांडली. युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने प्रतिवादींना नोटीस बजावण्याचे आदेश देत पुढील सुनावणीपर्यंत इस्टेट अधिकाऱ्यांनी 'पीपीई ॲक्ट' अंतर्गत कोणतीही पुढील कारवाई करू नये.

# लवकर या, लवकर जा..

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची महिला कर्मचाऱ्यांसाठी घोषणा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत विधिमंडळ अधिवेशनात राज्याच्या नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार राज्यातील महिला कर्मचाऱ्यांसाठी मोठी घोषणा केली. 'लवकर या, लवकर जा..' म्हणत महिलांना कामाच्या ठिकाणी लवकर आल्यास लवकर जाण्याची मुभा देण्यात येणार आहे. आम्ही घोषणा करत आहोत की, मुंबई महानगर क्षेत्रातील शासकीय कर्मचारी महिलांसाठी 'लवकर या लवकर जा' प्रणाली लागू करण्यात येत आहे. शासकीय नोकरीत असलेल्या महिला सकाळी ९.१५ वाजता कार्यालयात आल्या तर घरी जाताना त्यांना अर्धा तास लवकर सोडण्यात येईल, अशी घोषणा सुनेत्रा पवार यांनी विधानपरिषदेतून केली.

महिलांसाठी चांगली संधी उपलब्ध करून दिली त्याबाबत आभारी आहे. महिला दिनानिमित्ताने अनेक वरिष्ठ नेत्यांनी सभागृहात भाषण केलं, आपल्या भावना व्यक्त केल्या. काही चांगल्या सूचना यानिमित्ताने पुढे आल्या आहेत. या सभागृहात पुरुष सदस्यांनी देखील भावना व्यक्त केल्या, असे म्हणत सुनेत्रा पवार यांनी महिलांच्या प्रश्नासंदर्भाने भाषण केलं.आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून मी अत्यंत महत्त्वाची घोषणा करत आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील शासकीय महिला कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. 'लवकर या, लवकर जा..' याची घोषणा करत आहोत. त्यानुसार, मुंबई महानगर क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांना सकाळी ९.१५ वाजता कार्यालयात आल्या तर घरी जाताना त्यांना अर्धा तास लवकर सोडण्यात येईल, असे सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

सरकारने लाडकी बहीण, लेक लाडकी, अन्नपूर्णा सारख्या योजना आपण आणल्या आहेत. मेट्रोमनी साईड वरून होणारी फसवणूक रोखण्यासाठी देखील कायदा करण्याबाबत प्रयत्न केले जातील. लाडकी बहीण योजना प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. राज्यातील १७ हजार अंगणवाडीसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहितीही सुनेत्रा पवार यांनी दिली.



### साखर कारखान्यांचा मुद्दा

**राज्यात नविन उद्योग आणताना राज्यातील या कारखान्यांकडे मायेच्या नजरेने पाहायला पाहिजे. कारखाने ऋका तोट्यात येतात, ऋकारण एमएसपी ठरवण्याचा अधिकार हा केंद्राचा आहे, एमएसपी वाढली पाहिजे. केंद्राने आता इथेनॉल योजना आणली आहे. साखर ऋकारखान्यांनी कर्ज काढलं, कारखाने उभे राहिले, ऋइथेनॉल किती घ्यायचं हेही तेच ठरवातात. ऋआता सरकार म्हणतंय की इथेनॉल हे कारखान्यांकडून ३० टक्के घ्या आणि अन्नधान्यापासून ७० टक्के घ्या, असे म्हणत साखर कारखान्यांचाही मुद्दा सुनेत्रा पवार यांनी उपस्थित केला.**

### महिलांना प्रसुती रजा १ वर्षांपर्यंत...

**महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाच्या धर्तीवर १८० दिवसांची प्रसुती रजा मंजूर करण्यात आली आहे. प्रसुती रजेनंतर गरज भासल्यास कमाल १ वर्षापर्यंत वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय देय अर्धवेतन रजा घेण्यासही परवानगी देण्यात आली आहे. मातृत्वाचा सन्मान राखत, महिलांना कुटुंब आणि सेवेत समतोल राखता यावा हा या निर्णयामागचा उद्देश आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.**

## एका महिन्यात मोजणी करणे बंधनकारक

### जमीन मोजणीसाठी २०० खासगी भूमापक नियुक्त : बावनकुळे



**खरेदीपूर्वीची मोजणी, सहमतीने पोट-हिस्सा आणि पाणंद रस्ते मोजणीची कामे वेगाने व्हावीत, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली जाणार आहे. या निर्णयामुळे शासकीय यंत्रणेवरील ताण कमी होऊन सर्वसामान्यांचे जमिनीचे वाद सुटण्यास मदत होईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यात जमीन मोजणीसाठी दररोज हजारो अर्ज दाखल होत आहेत. शासकीय भूमापक कमी आणि जमीन मोजणी अर्ज जास्त असे चित्र आहे. त्यावर महसूल विभागाने तोडगा काढला असून नागरीकांना जलद सेवा देण्यासाठी राज्यात २०० खासगी भूमापकांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभा जाहीर केले.

अर्जदारांची जमिन मोजणी एक महिन्यात पूर्ण करण्याचे बंधनकारक आहे.

राज्यात सध्या पोट-हिस्सा, हद्दकायम, बिनशेती, गुंठेवारीसारख्या मोजणी प्रकरणांचा निपटारा मनुष्यबळाअभावी रखडला होता. शासनाने २०० परवानाधारक भूमापकांना दोन खासगी अभिकरणांमार्फत कार्यारंभ आदेश दिले आहेत. हे भूमापक दोन आठवड्यांचे विशेष प्रशिक्षण पूर्ण करून जमिन मोजणीस सुरुवात करणार आहेत. जमीन मोजणीचा अर्ज आल्यानंतर एका महिन्यात मोजणी पूर्ण करण्याचे बंधन घालण्यात आले असून ३० मार्च पासून हे भूमापक मोजणी करु शकणार आहेत,

जमिन मोजणीसाठी सरसकट नऊ हजार रुपये शुल्क आकारले जाते. अल्पभूधारक शेतकऱ्यांना हे शुल्क भरणे शक्य नाही. तेव्हा गरीब शेतकऱ्यांना कमी जमीन मोजणी शुल्क आकारण्यात यावे, अशी सूचना राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी केली. अडीच एकरपेक्षा कमी जमीन असलेल्या अल्पभूधारकांसाठी मोजणी शुल्काबाबत शासन वेगळा प्रस्ताव तयार करीत आहे असे बावनकुळे यांनी सांगितले.

राज्यातील १७ ते १८ तालुक्यांमध्ये मोजणीची प्रकरणे सर्वाधिक प्रलंबित आहेत, तिथे 'पायलट प्रोजेक्ट' **(पान ४ वर)**

# पीपीई किटशिवाय विषारी पावडर हाताळणे स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या जीवावर बेतले!

## श्रीरामपूर नगरपालिकेचे विचार कर्मचारी रुग्णालयात भरती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** पुरेशी काळजी, सुरक्षित उपकरणे आणि जबाबदारीची जाणीव नसल्याने चार स्वच्छता कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात आला! काल सकाळी वार्ड क्रमांक ७ मधील बेलापूर रोड, बजरंगनगर जवळील मसाले गल्ली भागात हाताने विषारी पावडर (जंतूनाशक) मारताना अचानक मळमळ, चक्कर येऊ लागल्याने चार कर्मचारी गंभीर आजारी पडले. त्यांना तातडीने साखर कामगार रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल करावे लागले. ही घटना नगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या निष्काळजीपणाची आणि मनुष्यबळाच्या दुर्लक्षाची थेट साक्ष आहे!

सुनील बागडे (५०), चंद्रकांत दळवी (५६), गोकुळ मारसाळे (३४) आणि अरुण अस्वले (३५) हे चार जण स्वच्छतेचे काम करत होते. त्यांना फक्त ग्लोव्हज आणि मास्क दिले होते, पण विषारी पावडरच्या उग्र वासाने आणि प्रत्यक्ष संपर्काने त्यांची तब्येत बिघडली. हा विषारी पदार्थ हाताने मारताना कोणतेही पुरेसे संरक्षण – नेत्रसंरक्षण, श्वाससंरक्षण किंवा विशेष सूट – नव्हते. मग हे ग्लोव्हज आणि मास्क फक्त दिखावा आहेत का? जेव्हा कर्मचारी रुग्णालयात पोहोचले, तेव्हा त्यांची प्रकृती जीवघेण्या स्थितीत होती! पालिकेचे आरोग्य अधिकारी रावसाहेब घायवट यांनी सांगितले की, त्यांची प्रकृती आता चांगली आहे. पण या कर्मचाऱ्यांवर का रुग्णालयात दाखल होण्याची वेळ आली? का त्यांना प्रथमच विषारी पावडर हाताळण्याचे प्रशिक्षण, योग्य पीपीई (प्रोफेशनल प्रोटेक्टिव्ह इक्विपमेंट) आणि सुरक्षित कामाची हमी दिली नाही? हे कर्मचारी कंत्राटी आहेत की कायमस्वरूपी, हेही स्पष्ट होत नाही. ठेकेदार आणि पालिका यांच्यातील जबाबदारी टाळाटाळीमुळे कामगारांचे जीव धोक्यात येतात! स्वच्छ भारत अभियानाच्या नावाखाली फोटो आणि घोषणाबाजी होत असते, पण प्रत्यक्षात स्वच्छता कर्मचाऱ्यांना विषारी रसायनांच्या आगीत ढकलले जाते.

### नगरपालिका प्रशासनाची जबाबदारी

- **सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांना पूर्ण पीपीई किट (मास्क, गॉगल्स, सूट, शूज, श्वाससंरक्षण यंत्रणा) उपलब्ध करावे.**
- **विषारी रसायन हाताळण्याचे प्रशिक्षण अनिवार्य करावे. कामाच्या ठिकाणी वैद्यकीय मदत आणि आपत्कालीन यंत्रणा उभी करावी.**
- **जबाबदार अधिकाऱ्यांवर आणि ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी.**

- **आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत झालेल्या प्रकाराची चौकशी सुरू असून सध्या कर्मचाऱ्यांची प्रकृती स्थिर आहे. नगरपालिका प्रशासन याबाबत गंभीर असून यामध्ये जर कोणी दोषी असेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.**

**– करण ससाणे**
**नगराध्यक्ष**

## घरगुती गॅसला प्राधान्य, नंतर खते, उद्योग आणि व्यावसायिक पुरवठा

### केंद्र सरकारकडून गॅझेट जारी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर :** आखाती देशांमधील तणावपूर्ण परिस्थिती आणि जागतिक ऊर्जा बाजारातील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर देशात गॅस टंचाईची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत गॅस पुरवठ्याचे नियमन करण्यासाठी गॅझेट आदेश जारी केला आहे. या निर्णयानुसार घरगुती वापरासाठीचा गॅस पुरवठा सुरळीत राहावा यासाठी विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे.

सरकारने स्पष्ट केले आहे की नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी काही क्षेत्रांना प्राधान्य देण्यात येईल. त्यांना त्यांच्या मागील सहा महिन्यांच्या सरासरी वापराच्या प्रमाणात गॅस पुरवठा करण्यात येणार असून आवश्यकतेनुसार काही गैर-प्राधान्य क्षेत्रांमध्ये कपात करण्यात येईल.

नैसर्गिक वायूच्या वितरणाचे नियमन करण्यासाठी हा आदेश आवश्यक वस्तू कायदा १९५५ च्या कलम ३ अंतर्गत जारी करण्यात **(पान ४ वर)**

### घरगुती गॅस आणि वाहतुकीला पहिलं प्राधान्य

**प्राधान्य श्रेणी १ मध्ये घरगुती पाइप्ड नॅचरल गॅस, वाहतुकीसाठी वापरला जाणारा कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस, एलपीजी उत्पादन आणि पाइपलाइन ऑपरेशनसाठी आवश्यक गॅस यांचा समावेश करण्यात आला आहे. या क्षेत्रांना मागील सहा महिन्यांच्या सरासरी वापराच्या १०० टक्के गॅस पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र हा पुरवठा उपलब्धतेवर अवलंबून असेल.**

### खत उद्योगाला ७०% गॅस पुरवठा

**प्राधान्य श्रेणी २ मध्ये खत उत्पादन करणाऱ्या कारखान्यांचा समावेश आहे. या उद्योगांना मागील सहा महिन्यांच्या सरासरी वापराच्या किमान ७० टक्के गॅस पुरवठा केला जाणार आहे. मात्र हा गॅस केवळ खत निर्मितीसाठीच वापरला जाईल. संबंधित कंपन्यांना याबाबतचे प्रमाणपत्र पेट्रोलियम प्लॅनिंग अँड ॲनालिसिस सेलकडे सादर करावे लागेल.**

## गॅस टंचाई : अहिल्यानगरमधील २५ टक्के उद्योगांना फटका

### सुमारे २५० कारखान्यातील १.५ हजार कामगारांवर परिणाम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** औद्योगिक वापराच्या गॅसचा पुरवठा बंद पडल्याने अहिल्यानगर शहरालगतच्या नागापूर एमआयडीसीमधील सुमारे २५ टक्के उद्योगांचे उत्पादन ठप्प झाले आहे. याचा थेट परिणाम सुमारे १५०० हजार कामगारांवर झाला आहे. गॅस पुरवठा सुरळीत रहावा यासाठी उद्योजकांचे शिष्टमंडळ जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार असल्याची माहिती असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज (आमी) या उद्योजकांच्या संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना दिली.

औद्योगिक वापराच्या गॅस पुरवठ्याचा प्रश्न युद्धाच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून जाणवू लागला असून त्यामुळे लघुउद्योजक अडचणीत आल्याचे त्यांनी सांगितले. सुमारे २०० ते २५० लघुउद्योजकांच्या कारखान्यातील उत्पादनावर परिणाम झाल्याचे त्यांनी सांगितले.

अधिक माहिती देताना जयद्रथ खाकाळ म्हणाले, पावडर कोटिंग करणाऱ्या कंपन्या, इलेक्ट्रिक मोटर, अल्टरनेटर याचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यातील उत्पादनातील विविध प्रक्रियांसाठी गॅसचा वापर आवश्यक असतो त्याशिवाय या प्रक्रिया होत नाहीत परंतु आता गॅस पुरवठा ठप्प झाल्याचा उत्पादनावर परिणाम झाला आहे. अनेक कंपन्यांच्या उत्पादनासाठी विविध प्रक्रियांसाठी औद्योगिक गॅसच्या वापराची आवश्यकता असते परंतु हा पुरवठा बंद पडल्याने उत्पादनच बंद झाले आहे.

नागापूर एमआयडीसीमध्ये सुमारे ९ ते १० हजार कामगार काम करतात **(पान ४ वर)**

## कर थकबाकीमुळे श्रीरामपूरचे जैन स्थानक सील

### श्रीरामपूर नगरपालिकेची कारवाई; व्यापाऱ्यांमध्ये खळबळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** अंतिम नोटीस देवूनही मालमत्ता कर न भरल्याने श्रीरामपूर नगरपालिकेने येथील जैन स्थानक सिल केले. त्यामुळे जैन समाजासह व्यापारी तसेच शहरातील नागरिकांत खळबळ उडाली आहे.

श्रीरामपूर नगरपालिकेने मालमत्ता कराच्या आकरणीबाबत कडक भूमिका घेतली आहे. त्यासाठी वसूली पथकाची नियुक्ती करून कर वसुलीचा धडाका सुरू केला आहे. प्रसंगी थकबाकीदारांच्या मालमत्ता सील करण्यास सुरुवात केली आहे.

शहरातील नागरिक, व्यापारी, गाळेधारक यांच्याकडे नगरपालिकेची मोठ्या प्रमाणात घरपट्टी, पणीपट्टी याची थकबाकी आहे. मार्च एंड असल्याने सदरची थकबाकी वसूलीसाठी पालिकेने मोहीम हाती घेतली आहे. थकबाकीदारांना आपल्याकडील थकबाकी भरण्यासाठी पालिकेने संबंधितांना नोटिसा पाठविल्या आहेत. त्यानंतरही थकबाकी न भरल्यास मालमत्ता सील करून जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे.

अशातच येथील स्थानकवासी जैन संघाच्या सांस्कृतीक भवनाकडे अशाच प्रकारे १५ लाख ७४ हजार ९१४ रुपये थकबाकी आहे. या थकबाकीच्या वसुलीसाठी पालिकेने श्री स्थानकवासी जैन संघास थकबाकी भरण्यासंदर्भात नोटिस दिली आहे. त्यात म्हटले आहे की, पंचजैन समाज वर्धमान स्थानकवासी जैन संघ यांचे नावांवर असलेली मालमता व नळ कनेक्शन यांची सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरीता माहे. फेब्रुवारी २०२६ अखेर एकूण १५ लाख ७४ हजार ९१४ रुपये इतकी रक्कम थकीत असून आपणाला यापूर्वी सदर थकबाकीची रक्कम भरणेबाबत आपणास वेळोवेळी मालमत्ता कराची बिले व थकबाकीची नोटीस देण्यात आलेली आहे. मात्र अद्यापपावेतो सदर मालमत्तेची आजअखेर असलेली थकबाकी रकमेचा भरणा कार्यालयात केलेला नाही. सदरची नोटीस मिळताच ७ दिवसाचे आत आपणाकडे असलेली थकीत व चालू रकमेचा भरणा आपण तात्काळ या कार्यालयात करावा. अन्यथा महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायत व औधोगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार सदर थकबाकी रक्कमेच्या वसुलीसाठी पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची आपण गांभीर्याने नोद घ्यावी, अशी नोटिस बजावण्यात आली होती. सदरची अंतिम नोटीस देवूनही मालमत्ता कर न **(पान ४ वर)**



श्रीरामपूर तालुक्याच्या नोटीसीला आम्ही उत्तर दिले आहे. चुकीच्या पद्धतीने जैनस्थानात सील केल्याने पालिके विरुद्ध आम्ही न्यायालयात जाऊ. जैन स्थानक हे आमचे मंदिर आहे. मंदिराकडून कर घेतला जात नाही. कायद्यानुसार त्यात सूट दिली जाते. मात्र चुकीच्या पद्धतीने केल्या जाणाऱ्या तक्रारींच्या आधारे पालिकेनेही चुकीची कारवाई करणे दुर्दैवी आहे.

**– रमेश लोढा,**
अध्यक्ष :स्थानकवाशी जैन संघ श्रीरामपूर

# संपादकीय

## अत्यावश्यक सेवा कायद्याचे ब्रह्मास्त्र

आखाती देशांमध्ये युद्धाचा भडका उडाल्याने जगभरात इंधन टंचाईचे चटके जाणवू लागले आहेत. महाराष्ट्रासह भारतात अनेक ठिकाणी घरगुती एलपीजी गॅससिलेंडर, व्यावसायिक एलएनजी आणि सीएनजीचा तुटवडा निर्माण झाला आहे.एरवी बुकिंगनंतर काही दिवसांमध्ये मिळणाऱ्या घरगुती गॅस सिलेंडरसाठी ग्राहकांना अनेक दिवस वाट पाहावी लागत आहेत. त्यामुळे सामान्य नागरिकांची चिंता वाढली आहे. या गॅस तुटवड्याच्या संकटावर उतारा म्हणून आता केंद्र सरकारने देशभरात अत्यावश्यक वस्तू कायदा अर्थात अत्यावश्यक सेवा कायदा लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या कायद्याचे वर्णन अनेकजण ब्रह्मास्त्र असे करतात. १९५५ साली हा कायदा अस्तित्वात आला होता. या कायद्याच्या अंमलबजावणीनंतर केंद्र सरकारने देशातील सर्व पेट्रोकेमिकल कंपन्यांना इतर उत्पादनांमध्ये एलपीजी गॅसच्या उत्पादनाला अधिक प्राधान्य देण्याचा आदेश दिला आहे.

पश्चिम आशियातील युद्धाच्या झळा गेल्या दोन दिवसांपासून भारताला अधिक प्रमाणात जाणवू लागल्या आहेत. इराणने होमुर्झची सामुद्रधुनी बंद केल्याने इंधनाचे अनेक टँकर्स समुद्रात अडकून पडले आहेत. त्यामुळे भारतात इंधन टंचाई निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर एरवी पेट्रोलियम क्षेत्रात अपवादानेच वापरला जाणारा अत्यावश्यक सेवा कायदा लागू करण्यात आला आहे. केंद्र सरकारकडून ५ मार्च २०२६ रोजी लागू करण्यात आला आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने देशातील सर्व तेलशुद्धीकरण कारखान्यांना प्रोपेन आणि ब्युटेनचा वापर केवळ एलपीजीच्या निर्मितीसाठी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जेणेकरुन देशातील नागरिकांना घरगुती गॅसचा कोणताही तुटवडा जाणवणार नाही, अशी केंद्र सरकारची योजना आहे.अत्यावश्यक वस्तू कायदा अर्थात अत्यावश्यक सेवा कायदा १९५५ साली संसदेत मंजूर करण्यात आला होता. या कायद्यानुसार कोणत्याही अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन, साठवणूक, विक्री आणि किंमत ठरवण्याचे अधिकार केंद्र सरकारच्या हातात येतात. पेट्रोलिअम आणि पेट्रोलियम पदार्थ सुरुवातीपासूनच या कायद्याच्या कक्षेत येतात.

या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना सेक्शन ७ नुसार, तीन महिने सात वर्षांची शिक्षा आणि दंड होऊ शकतो. पेट्रोलियम क्षेत्रात अत्यावश्यक सेवा कायद्याचा उपयोग क्वचितच होतो. यापूर्वी २०२२ मध्ये युक्रेन-रशिया युद्धाच्यावेळी या कायद्याचा वापर करण्यात आला होता. त्यावेळी सर्व तेलशुद्धीकरण कंपन्यांना निर्यात रोखण्याचे निर्देश देऊन देशांतर्गत पुरवठा वाढवण्यास सांगण्यात आले होते. भारतात दरवर्षी ३१.३ दशलक्ष टन एलपीजी वापरला जातो. त्यापैकी केवळ १२.८ दशलक्ष टन एलपीजीची उत्पादन भारतात होते. याचा अर्थ ५८ टक्के एलपीजी हा आयात केला जातो. त्यापैकी ८५ ते ९० टक्के एलपीजी हा होमुर्झच्या सामुद्रधुनीतून भारतात दाखल होतो. इराण-अमेरिका युद्धामुळे ही सामुद्रधुनी बंद झाल्याने भारताकडे येणारे सर्व एलपीजी गॅसचे टँकर्स समुद्रात अडकून पडले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, सध्या भारताकडे केवळ २५ ते ३० दिवस पुरले इतकाच एलपीजीचा साठा शिल्लक आहे. इराणच्या हल्ल्यात कतारमधील एलएनजी उत्पादनाची केंद्रे ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या माऱ्यामुळे उद्ध्वस्त झाली होती. त्यामुळे कतार सरकारने या सर्व ठिकाणी एलएनजी उत्पादन थांबवले होते.

अत्यावश्यक वस्तू कायदा अर्थात अत्यावश्यक सेवा कायदा लागू झाल्याने देशातील रासायनिक कंपन्यांवर सर्वाधिक विपरीत परिणाम होऊ शकतो. प्रोपेन आणि ब्युटेन वापरण्यास मज्जाव केल्याने रासायनिक कंपन्यांच्या उत्पादनावर मोठा परिमाण होणार आहे. घरगुती गॅस सिलेंडरची किंमत ६० रुपयांनी वाढली आहे. तर कमर्शिअल एलपीजीसाठी होणारा गॅसचा पुरवठा थांबवण्यात आला आहे. त्यामुळे हे युद्ध आणखी काही काळ सुरु राहिल्यास देशात इंधन टंचाई भीषण होऊ शकते.

## नववीच्या विद्यार्थिनीची छेडछाड; चालकासह गाडी मालक व संस्थेविरुद्ध कारवाईची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथे शाळेच्या बस चालकाने नववीत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीची छेडछाड केल्याची संतापजनक घटना समोर आली असून परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात बस चालकासह गाडी मालक व संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनालाही सहआरोपी करून कठोर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी हा मानोरी येथील रहिवासी असून तो संबंधित शाळेत बस चालक म्हणून कार्यरत होता. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आरोपीला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. यावेळी जाब विचारण्यासाठी गेलेल्या मुलीच्या पालकांवरही मारहाण झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात आरोपीवर पोस्को कायद्यानुसार गुन्हा दाखल करून सखोल चौकशी करावी. तसेच आरोपीने काही मुलींचे व्हिडिओ काढल्याचा संशय असल्याने त्याचीही तपासणी करण्यात यावी, अशी मागणी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.



# कोटीचा निधी मंजूर : आ. खताळ

### रस्त्यांसाठी २५ कोटी, तसेच ६ कोटी म्हाळुंगी नदीवरील पुलासाठी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून संगमनेर तालुक्यातील विविध रस्त्यांच्या विकासासाठी २५ कोटी व वेल्हाळे ते राजापूर म्हाळुंगी नदीवरील पुलाच्या बांधकामासाठी ६ कोटी असे एकूण ३१ कोटी रुपयांचा निधी अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आला असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली.

मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच अर्थ संकल्प जाहीर केला. या अर्थसंकल्पामध्ये तालुक्यातील ग्रामीण भागातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामांच्या विकासासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. या निधीमुळे तालुक्यातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे या निधीतून कोकणगाव ते मांची घाट, सुकेवाडी ते राष्ट्रीय महामार्ग ५० , चिंचेवाडी-साकूर, ते राष्ट्रीय महामार्ग ७१ ते मारुती मंदिर, अकोले नाका शारदा शाळा ते तीन बत्ती चौक, निमगाव बुद्रुक गाव, राजापूर तसेच जोर्वे नाका ते निंबाळे चौफुली नान्नज



दुमाला ते पारेगाव बुद्रुक, निमगाव टेंभी ते शिरापूर, जोर्वे ते वडगाव पान, कवठे कमळेश्वर ते लोहारे, झोळे ते नांदुरी दुमाला, वाघापूर ते जिल्हा महामार्ग डिग्रस-अंभोरे, चिकणी ते डोंगरगाव, हिवरगाव पठार ते जिल्हा महामार्ग, तसेच कोकणगाव ते डोंगरे वस्ती व नवले वस्ती ते जिल्हा महामार्ग या रस्त्यांच्या विकासाची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

या कामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र भोसले, राज्यमंत्री इंद्रनील नाईक आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून हा निधी मंजूर झाल्याबद्दल आमदार अमोल खताळ यांनी त्यांचे जनतेच्या वतीने आभार मानले आहे.

## आधारकार्ड कॅम्पद्वारे नागरिकांना दिलासा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त ऋषी छल्लारे फाउंडेशनच्या वतीने मोफत ज्येष्ठ नागरिक (सीनियर सिटीजन) कार्ड वाटप व आधार कार्ड कॅम्पचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून सुमारे ७० ज्येष्ठ नागरिकांना सीनियर सिटीजन कार्ड देण्यात आले, तसेच आधार कार्डासंदर्भातील नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यात आल्या.

लोकनेते माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवा नेते नीरज मुरकुटे यांच्या सहकार्यातून हा उपक्रम मंगळवारी (दि. १०) आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन गावातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजाला ज्ञानाची प्रेरणा देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आदर्श समाजाने कायम ठेवावा, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.ऋषी छल्लारे फाउंडेशनच्या माध्यमातून गावामध्ये विविध शासकीय योजनांबाबत जनजागृती केली जाते. तसेच बांधकाम कामगारांना योजनांचा लाभ, ई-श्रम कार्ड, लाडकी बहीण योजना, आरोग्य शिबिरे, तसेच ज्येष्ठ नागरिक व एकल महिलांसाठी विविध योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमास तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष रामदास शिंदे, फाउंडेशनचे संस्थापक गणेशभाऊ छल्लारे, चेअरमन कारभारी तागड, व्हा. चेअरमन दत्तात्रय पटारे, माजी चेअरमन सागर शिंदे, बाळासाहेब विधाटे, अण्णासाहेब काळे, पत्रकार चंद्रकांत झुरंगे, राजेंद्र राहिंज, काळूमामा डुकरे, सोपान कोल्हे, भास्कर राहिंज आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिंदुस्थान फिड्स व थोरात दूध संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** सामाजिक बांधिलकी जपत संगमनेर तालुक्यातील पानोडी येथे स्व. शिवाजीराव प्रतापराव थोरात सहकारी दूध उत्पादक संस्था आणि हिंदुस्थान फिड्स प्रा. लि., श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांना टिफिन डब्बा व शालेय बॅगचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

पानोडी येथे आयोजित कार्यक्रमात थोरात विद्यालय तसेच गावठाण, हजारवाडी आणि ठाकरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना टिफिन डब्बे व शालेय पिशव्या देण्यात आल्या. आकर्षक साहित्य हातात मिळताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकताना दिसत होता.हिंदुस्थान फिड्स प्रा.लि. ही कंपनी गेल्या चार दशकांपासून दूध उत्पादकांना गुणवत्तापूर्ण पशुखाद्य पुरवित असून सामाजिक बांधिलकीतून 'सीएसआर' उपक्रमांतर्गत शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण तसेच आपत्तीग्रस्तांना मदत असे विविध उपक्रम राबवित आहे.



या कार्यक्रमास स्कूल कमिटीचे अध्यक्ष विनायकराव थोरात, दूध संस्थेचे चेअरमन गणेश जाधव, शरदराव जाधव, विठ्ठल घोडेकर, माणिकराव पाबळ, बाळासाहेब सानप, पत्रकार राजेश गायकवाड उपस्थित होते. तसेच थोरात विद्यालयाचे मुख्याध्यापक पोपट सोनवणे व जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका शुभांगी गोडसे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमासाठी कंपनीचे मार्केटिंग ऑफिसर रवींद्र पवार, सेल्स ऑफिसर सचिन आदिक, विजय गोसावी यांच्यासह शिक्षक व ग्रामस्थांनी सहकार्य केले.

## प्रवरेमुळेच आज सर्व प्रकारचे शिक्षण आपल्या दारात : डॉ. भास्कर खर्डे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** लोकनेते डॉ बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधीने सन्मानित ) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कोल्हार येथील प्रवरा हायस्कूल या सीबीएसई शाळेत आज १० वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला.मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यालयाचे प्राचार्य सुधीर मोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस संदर्भात मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. भास्करराव खर्डे म्हणाले की प्रवरा पब्लिक स्कूल च्या पहिल्या बॅचचा



मी विद्यार्थी आहे.पद्मश्री विखे पाटलांनी ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाच्या सर्व क्षेत्रातील दरवाजे उघडे करून यशाचा मार्ग मोकळा करून दिला.

माझा शेतकऱ्याचा मुलगा इंग्लिश बोलला पाहिजे, डॉक्टर इंजिनियर झाला पाहिजे उच्च शिक्षण घेऊन मोठ मोठ्या पदावर त्याने नेतृत्व केले पाहिजे केवळ या उद्देशानेच प्रवरेच्या शिक्षण रुपी गंगोत्री ची सुरुवात ग्रामीण भागातून केली. याप्रसंगी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

कु.अनन्या घोलप हिने आपले मनोगत व्यक्त केले. कु.मिताली अंबुलगेकर आणि सायली खर्डे हिने शाळा आणि शिक्षक यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शाळेचे शिक्षक अमोल म्हस्के यांनी याप्रसंगी आपले विचार मांडले.

याप्रसंगी संभाजीराजे देवकर, अशोक शेठ असावा, ज्ञानेश्वर खर्डे, सुनील शिंदे, प्रशांत खर्डे,आदी मान्यवर उपस्थितीत होते .कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संभाजी आव्हाड, गोविंद तांबे इत्यादींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साईशा तुपे आणि स्वरा सातकर आणि अनन्या गागरे यांनी केले. तर आभार अर्णव भालके यांनी मानले.

## पैठणीचा खेळ' कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कुकाणा :** येथे मैत्रेय महिला मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित 'खेळ पैठणीचा व जागर स्त्री शक्तीचा' या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध स्पर्धांमध्ये डॉ. प्रिती नांगरे यांनी प्रथम क्रमांक पटकावत पैठणीचा मान मिळविला, तर नृत्य स्पर्धेत कांचन पवार प्रथम क्रमांकाच्या विजेत्या ठरल्या.

या कार्यक्रमात महिलांसाठी नृत्य स्पर्धा, उखाणे, गायन, संगीत खुर्ची, फुगडी, ग्रुप डान्स, भारूड आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग घेतला. विविध स्पर्धांमधील विजेत्यांना पैठणी देऊन गौरविण्यात आले.

पैठणी स्पर्धेत प्रथम डॉ. प्रिती नांगरे, द्वितीय समीक्षा गाडेकर, तृतीय प्राप्ती बोरुडे, चौथा क्रमांक संपदा ससे आणि पाचवा क्रमांक हर्षा मुनोत यांनी मिळविला. नृत्य स्पर्धेत प्रथम कांचन पवार, द्वितीय सुमन जगताप व विजया जोजार (संयुक्त) तर तृतीय प्रितम वाघमारे ठरल्या.

विजेत्यांना सरपंच लताताई अभंग, अर्चना कांडेकर, अश्विनी विश्वंभर, अनिता कचरे, स्वाती कासार, सीमा भंडारी, सोनाली सोनवणे, राजनंदिनी फुलमाळी, अनिता सोनवणे, कविता कासार, अनघा देडगावकर व कविता काळे यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी कदम यांनी केले, तर आभार डॉ. विद्या कोलते यांनी मानले.



## खंडोबा वस्ती शाळेत जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान:**जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा परिषद वस्ती शाळा खंडोबा वस्ती टाकळीभान या ठिकाणी निपुण महाराष्ट्र अंतर्गत महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी निपुण महाराष्ट्र कार्यक्रमाच्या जिल्हा समन्वयक वंदना पटारे उपस्थित होत्या. त्यांनी महिला माता पालकांनी मुलांचा अभ्यास कसा घ्यायचा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर महिला आणि बालके यांच्या आरोग्य विषयी आणि महिला सबलीकरण याविषयी घरगुती व्यवसायांचे मार्गदर्शन डॉ. मोरे यांनी केले व शाळेचे मुख्याध्यापक शिंदे सर यांनी आलेल्या महिलांचे पुष्प देऊन स्वागत केले श्री आहेर सर यांनी आभार मानले.

## लोकसहभागातून कोंढवड येथे हनुमान मंदिर उभारणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील कोंढवड गावाने ग्रामएकता, श्रद्धा आणि लोकसहभागाचा आदर्श घालून देत ग्रामदैवत हनुमान मंदिराचे आकर्षक बांधकाम पूर्ण केले आहे. ग्रामस्थांनी एकदिलाने पुढाकार घेत श्रमदान, आर्थिक मदत आणि विविध प्रकारे सहकार्य करत मंदिर उभारले असून या उपक्रमामुळे गावाच्या वैभवात भर पडली आहे.

मंदिर उभारणीसाठी गावातील प्रत्येक कुटुंबाने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. काहींनी आर्थिक मदत केली, तर अनेकांनी श्रमदान करून बांधकामात हातभार लावला. युवकांनी नियोजन व व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळली, तर ज्येष्ठांनी मार्गदर्शन केले. महिला मंडळानेही विविध उपक्रम राबवून मंदिर उभारणीसाठी योगदान दिले. गावाबाहेर नोकरी किंवा व्यवसायानिमित्त स्थायिक असलेल्या ग्रामस्थांनीही आर्थिक मदत पाठवून गावाशी असलेले आपले नाते जपले.दरम्यान, नवीन हनुमान मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व मंदिर जीर्णोद्धार सोहळा मोठ्या भक्तिभावात साजरा केला जाणार आहे. १२ ते १६ मार्चदरम्यान विविध कीर्तन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नरेंद्र महाराज गुरव, जगन्नाथ महाराज पाटील, ज्ञानसिंधू संदिपान महाराज आसेगाव आदींची कीर्तने होणार आहेत. १५ मार्च रोजी ज्ञानेश्वरी ग्रंथ मिरवणूक तर १६ मार्च रोजी विविध संतांच्या उपस्थितीत मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडणार आहे. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार असून परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघणार आहे.



## सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी : डॉ. आरसुळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, त्रिमूर्तीनगर येथे स्त्री शिक्षणाच्या जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे म्हणाले की सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले कार्य अतुलनीय आहे. समाजातील अज्ञान, अन्याय आणि विषमता दूर करण्यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. शिक्षणाच्या माध्यमातून समाजात समानता व जागृती निर्माण करण्याचे महान कार्य त्यांनी केले. आजच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ.चांगदेव आरसुळे, महाविद्यालयाच्या समन्वयिका डॉ.अनुराधा गोरे,उपप्राचार्य प्रा. निकिता बर्गे, प्रा. गोरख गुंड, प्रा. संतोष जावळे, प्रा.अनिकेत आरसुळे, प्रा.राहुल बोरुडे, प्रा. सोमनाथ खेडकर, प्रा.प्रवीण आवारे, प्रा. नितीन चिरमाडे, प्रा.मंगेश वैरागर, प्रा. योगिता गायकवाड तसेच महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



रमजानुल मुबारक २०२६
रोजा नंबर २१

# " एहतेकाफ व लैलतुल कद्र : मानवी मुल्यं वृद्धिंगत करण्याकरिता"

दिव्य कुरआन अल्लाह सांगतात , " (१),आम्ही या ( पवित्र कुरआन ) ला कद्र च्या पवित्र रात्रीतच अवतारीत केलं आहेत, (२) तुम्हाला काय माहित, कीं, त्या कद्र च्या रात्रीचे महत्व काय आहेत ?, (३) ती( एक ) कद्र ची रात्र हजार महिन्यां पेक्षा काही अधिक उत्तम आहेत., (४), त्या रात्री असंख्य स्वर्ग इशदूत आपल्या पालनकर्त्या ( परमेश्वर - भगवंता )च्या आदेशानुसार प्रत्येक आदेश घेऊन पृथ्वीवर उतरतात , (५) ते पहाट होयीपर्यंत ती संपूर्ण कद्र ची रात्रं शांतता व सुरक्षिततेची रात्रं आहेत... ( पवित्र कुरआन, पारा ३० वां, सुरह नं. ९७, अल - कद्र आ. नं. ०१ ते ०५.संपूर्ण ).,

आज आपला यावर्षी चा २१वां रोजा, वीस पूर्ण होऊन, तिसरा विभाग ( अशराह )अर्थातच "जहान्नम ( नरका)तील" नरक अग्नी पासून स्वरक्षण ".

एहतेकाफ, रमजानच्या शेवटच्या विभागात( अशराह) त २० व्या (विसाव्या) रात्री पासून लैलतुल कद्र ची २१ वी रात्रं विषम संख्या अर्थात "पवित्र ताक "रात्रं चालू होतें, संपूर्ण दहा दिवस २४ तास जगातील प्रत्येक मोहल्ला, गल्ली,गाव शहरातील प्रमुख काही श्रद्धांवान बंधूना आग्रहाचे निमंत्रण देवून दहा दिवसासाठी, कुणाला आपल्या फुरसतीच्या वेळेनुसार मस्जिदच्या एका कोपऱ्यात बसून अल्लाहशी नतमस्तक होतं,२४ तास नामस्मरण करण्यासाठी विनंती करतात, त्याला "एहतेकाफ " म्हणतात.

या दिवसामध्येच २१,२३,२५,२७,२९,३० या विषम संख्येने येणाऱ्या रात्रं या लैलतुल कद्र च्या पवित्र रात्रीं असतात.. ती एक रात्रं म्हणजे एक महिन्यापेक्षा हीं जास्त अशी पवित्र रात्रं, त्याचं मूल्य पुण्य शब्दातीत असतं. त्या रात्रीचं एक क्षण क्षण महत्वाचं. अनादी काळात माणसाचं वयोमान एक एक हजार वर्षाचं होतं म्हणून पैगंबर मुहम्मद स्व साहेबाना काही मित्रांनी प्रश्न विचारलेतं की पूर्वीच्या आमच्या काही पूर्वजांनी एक हजार वर्षे अल्लाह चे नामस्मरण करून तेवढे पुण्य मिळवलं, तर, आमचे सध्याच्या लोकांचं आयुष्यमान फार कमी आहेत तर तेवढ्या पुण्य कमवण्याची आम्ही बरोबरी करू शकत नाही.. तर अल्लाह नें त्यांच्या येवढ पुण्य कामावण्यासाठी च या लैलतुल कद्र च्या रात्रीं ची संधी पैगंबर मुहम्मद स्व च्या मानणाऱ्यांना करून दिली.

जेवढ्या जास्त संख्येत बंधू बसतील तेवढे चांगले असते.. संपूर्ण गाव -मोहल्ला- गल्ली बसू शकत नाहीं, ज्यांना नामस्मरण करण्यासाठी वेळ असेल अशा श्रद्धांवान बंधूना बसवून सर्वां तर्फे जगाच्या शांततेसाठी- सुखरूप आरोग्य लाभावे, -सुख -समृद्धी लाभावी, प्रार्थना करण्यासाठी विनंती करतात.

वीस दिवस झालीत काहीच प्रार्थना केले नाहीं, अपल्या रोजच्या संसराच्या फेऱ्यात अडकून पडलो, येणारे दहा दिवस बाकी असल्यामुळे संधी अजूनही आहे. बाहेरील जगाचा राहाडा विसरून अल्लाह शी एकरूप देहभान विसरून,अल्लाह च्या नामस्मरणात तल्लीन होऊन होणं. धायमोकळून -रडून डोळ्यात पाणी आणून, कोणाला अजानतेपनीं बोललो असेल, एखाद्याला वेडे वाकडे बोल बोललो असेल, कुणाचे मन दुखावले असेल, अपशब्द वापरलीत असेल, कळत- नकळत भावना दुखावल्या असेल, स्वतः मध्ये अहंकाराची भावना उत्पन्न झाली असेल तर त्वरित अल्लाहशी तल्लीन होऊन माफी मागनं, माफ करणारा फक्त अल्लाह च आहेत..

काही गोष्टीमुळे नकळत अहंकार हा येतच असतो, आयुष्यात खूप काही गडबडी होतात.. सगळे काही संपून जातं . पैसा संपत्ती. काहीच शिल्लक राहत नाहीं.

पैगंबर मुहम्मद स्व. सांगतात कीं, " ज्या व्यक्तीच्या मानत तिळमात्र देखील अहंकार, मी, गर्व असेल, अशा, व्यक्ती स्वर्गात कधीच जाणार नाहीं ".

पुन्हा , पैगंबर मुहम्मद स्व.सांगतात,कीं, " अल्लाह( भगवंत )सुंदर आहेत , अल्लाह ला सौंदर्य आवडते. अहंकार हा सत्याला नाकारतो आणि दुसऱ्याला तुच्छ समजतो, " ( हदीस इब्न मसउद, मुस्लिम शरीफ ).

कोणत्याही गोष्टीचा अहंकार बाळगू नये, आलेला " मी , अहंकार आपल्या उन्नती साठी बाधा ठरतो, आयुष्याच्या प्रगतीला अडचणीत आनतो , आयुष्यात जागोजागी गडबड करीत असतो म्हाणून अहंकाराला घालवण्यासाठी आपल्या व्यस्त जीवनाचा थोडा वेळ काढून एका जागी शांत चित्त बसून अल्लाहशी निर्वीकार एकरूप होऊन संपूर्ण समर्पित होऊन तल्लीन होऊन दुवा प्रार्थना करा, अंतर्मनांतील दडलेल्या प्रत्येक कवाडे, केलेल्या चुकांची मनमोकळे उदाहरणार्थ : खास मित्रां बरोबर मनातील गोष्टी बिनंधास्त बोलतोय, सांगतोय अगदीच तशाच प्रकारे, त्याच प्रमाणे विशेष म्हणजेच आरे -कारे च्या स्वरूपात अल्लाह ( परमेश्वर - भगवंता ) शी व्यक्त होणं. माफी मागणं -रित्या होणं -व्यक्त होणं, रडून धाय मोकळून रडू रडू वारंवार मागनीं करणं . अल्लाह ला राजी करणे हेच महत्वाचं.

शास्त्र -सायंटिस्ट सांगतात, आपण आपल्या अंतरमनातील सर्व विसरून, तल्लीन एकरूप होऊन जातोय, लिन होतोय, जोर जोराने जेंव्हा आपल्याला भान नसतं की आजू बाजूला कोण आहेत म्हणून एवढं तल्लीन होतो , त्या वेळी सममोहित होत असतो, - स्वतःच स्वतः ला सममोहित करीत असतो, अर्थात आपल्या मनातील चुकीचं - विचार गोष्टी - निगेटिव्ह एनर्जी चे कालांतराने (पॉसिटीव्ह) सकारात्मक एनर्जी विचारा मध्ये बदल होत होत परवार्तीत ( ट्रांसफर ) होत असतात. मनुष्य मन मोकळे होऊन एक नवीनच अनुभव मनाला येतोय. मनुष्य ताजातावाना होत असतो. नवीनच ऊर्जा प्राप्त झाल्या सारखं वाटतं, मोकळं झालं सारखं होवून मनातील अपराधी पानाची भावना एकदा ची कमी होते.अशा मुळे नकारात्मक विचाराचे सकारात्मक विचारात परिवर्तन होतं आणि हेच साध्य करायचं असतं.



डॉ. सलीम शेख
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## महिला मंडळ,श्रीरामपूर तर्फे महिला पुरस्कार जाहीर

**श्रीरामपूर** : महिला मंडळ, श्रीरामपूरतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त दरवर्षी दिले जाणारे जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय पुरस्कार जाहीर झाले. बुधवार दि. ११ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता स्वयंवर मंगल कार्यालय येथे हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. ह्यावर्षी कै. शुभलक्ष्मी थत्ते जिल्हास्तरीय पुरस्कार हा शिर्डी येथील साई आश्रया परिवार ह्या अनाथ, दिव्यांग मुलांच्या सामाजिक संस्थेच्या सहसंचालिका आशाताई दळवी ह्यांना देण्यात येणार आहे. कै. प्रा. विजयाताई कुऱ्हे पुरस्कार हे प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सरिता देशपांडे (वैद्यकीय क्षेत्र) आणि आर्ट ऑफ लिव्हिंगच्या मार्गदर्शक सुजाता शेडगे (सामाजिक व अध्यात्मिक क्षेत्र) ह्या दोघीना देण्यात येणार असून कै. सरलाताई मुथा आदर्श सदस्य पुरस्कार हा नीता जगताप ह्यांना दिला जाणार आहे. सदर कार्यक्रमात साई आश्रया परिवार संस्थेसाठी वस्तू किंवा किराणा स्वरूपात मदत स्वीकारली जाणार असून अधिकाधिक नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन मंडळाने केलेले आहे.कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून जास्तीत जास्त संख्येने नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन महिला मंडळ, श्रीरामपूर चे विश्वस्त, अध्यक्ष, पदाधिकारी आणि कार्यकारिणी ह्यांनी केले आहे.

## नारायणगिरी महाराज १७ व्या पुण्यातिथी निमित्त आज अरूणनाथगिरी महाराजांचे प्रवचन

**माळवाडगांव** : आज बुधवार दि.११ मार्च रोजी सदगुरू नारायणगिरी महाराज यांच्या १७ व्या पुण्यतिथी सोहळा निमित्ताने श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थान येथे सकाळी १० वाजता मठाधिपती अरूणनाथगिरी महाराज यांचे सत्संग प्रवचन होणार आहे.गुरूवर्य नारायणगिरी महाराज यांचा पुण्यातिथी सोहळा सालाबादप्रमाणे यावर्षीही अडबंगनाथ संस्थान येथे साजरा करण्यात येणार आहे.सकाळी ९ वाजता नाथांची अभिषेक पुजा आरती, त्यानंतर सदगुरू नारायणगिरी पुजन प्रार्थना होईल. १० वाजता मठाधिपती अरूणनाथगिरी महाराज यांचें गुरूवर्य नारायणगिरी या चरित्रावर सत्संग प्रवचन होणार आहे. प्रवचनानंतर महाप्रसाद पगंत होईल.

## अब्दुल कलाम कॉलेजचे क्रिकेट आणि व्हॉलीबॉलमध्ये प्रथम पारितोषिक



**प्रवरानगर** : पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय फिजिओथेरपी क्रीडा स्पर्धेत प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश संपादन केले आहे. या स्पर्धेत कॉलेजच्या संघाने टेनिसबॉल क्रिकेट आणि व्हॉलीबॉल या दोन्ही खेळांत प्रथम क्रमांक पटकावला, तर लेदरबॉल क्रिकेटमध्ये उपविजेतेपद मिळवले, अशी माहिती प्राचार्य डॉ. आर.के. सिन्हा यांनी दिली. पुण्यातील डेक्कन जिमखाना येथे ५ मार्च ते ८ मार्च या कालावधीत या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. टेनिसबॉल क्रिकेटच्या अंतिम सामन्यात प्रवरेच्या संघाने उत्कृष्ट संघभावना आणि ऊर्जा दाखवत चार गडी राखून विजय मिळवला. व्हॉलीबॉल स्पर्धेतही संघाने निर्भेळ यश मिळवत अंतिम फेरीत २-० अशा फरकाने अजिंक्यपद पटकावले.

लेदरबॉल क्रिकेटमध्ये चुरशीच्या लढतीत संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. क्रिकेट संघाचे नेतृत्व डॉ. सुरज भाने यांनी, तर व्हॉलीबॉल संघाचे नेतृत्व सहाय्यक प्राध्यापक डॉ. अथर्व गुंजाळ यांनी केले. वैयक्तिक कामगिरीमध्ये अनिकेत गायकवाड याला क्रिकेटमधील 'प्लेयर ऑफ द टूर्नामेंट' आणि डॉ. शिव सरदार याला व्हॉलीबॉलमधील 'प्लेयर ऑफ द टूर्नामेंट' हा किताब देऊन गौरविण्यात आले. या यशस्वी खेळाडूंचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे, कुलगुरू डॉ. व्ही.एन. मगरे, विश्वस्त सुवर्णाताई विखे, मोनिकाताई सावंत, ध्रूव विखे, प्राचार्य डॉ. आर.के. सिन्हा, क्रीडा संचालक डॉ. सुनील बुलार आणि विद्यार्थी समन्वयक डॉ. प्रदीप बोरकर यांनी अभिनंदन केले आहे.

## मक्तापूर येथे शिवजयंती उत्साहात

**नेवासा** : तालुक्यातील मक्तापूर येथे छत्रपती शिवरायांच्या कर्तृत्वाचे पोवाडे गात छत्रपती शिवाजी महाराजांची शिवजयंती उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. शिवरायांच्या जयघोषाने परिसर दुमदुमला होता. नेवासा फाटा मुकिंदपूरचे पोलीस पाटील आदेश साठे यांनी छत्रपती शिवरायांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पराक्रमाचे व स्वराज्याची संकल्पना आणि जनतेसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. यावेळी सुकाणू समिती महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांनी समाजात ऐक्य आणि बंधुभाव वाढवण्यासाठी शिवजयंती व भीम जयंती एकत्र साजरी करण्याचे आवाहन केले.

पत्रकार बादल परदेशी यांनी आपल्या भाषणातून शिवरायांचे विचार प्रत्येकाने आत्मसात करण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी मेजर गणेश शिंदे, तंटामुक्त अध्यक्ष दत्ताभाऊ कांगणे, आरपीआयचे शहराध्यक्ष पप्पू भाऊ इंगळे,मक्तापूरचे पोलीस पाटील सरपंच अनिल लहारे,आयुष्य बापू नवघरे व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात काचोळे विद्यालय प्रथम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

श्रीरामपूर : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पुणे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर येथे आयोजित जिल्हास्तरीय शिक्षक-विद्यार्थी विज्ञान प्रदर्शनात श्रीरामपूर येथील डी. डी. काचोळे माध्यमिक विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले.

या प्रदर्शनातील थीम बेस विभागात विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला, तर डिजिटल लिटरसी विभागात तृतीय क्रमांक मिळविला. जिल्हास्तरावर दोन पारितोषिके मिळवणारी डी. डी. काचोळे विद्यालय ही एकमेव शाळा ठरली आहे. या स्पर्धेत वैष्णवी सतीश सूर्यवंशी, निर्मिती प्रसन्ननाथ गुप्ता, सौम्या ज्ञानदेव पगार, वृषभ लक्ष्मीकांत कुलकर्णी, अजिंक्य संजय भालदंड आणि साई महेंद्र गिरमे या विद्यार्थ्यांनी विज्ञान उपकरणांच्या माध्यमातून उत्कृष्ट सादरीकरण केले. या विद्यार्थ्यांना शिक्षक सुनील बनकर व मनोहर शेवाळे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, जनरल बॉडी सदस्य प्रकाश पाटील निकम, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, मुख्याध्यापक सुनील साळवे तसेच विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.




# तिर्थक्षेत्रांच्या विकासाला महायुती सरकारकडून मोठा निधी : शालिनी विखे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : शिर्डी मतदार संघातील रस्त्यांच्या विकासासाठी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत आहेत. तिर्थक्षेत्रांच्या विकासालाही गती मिळत असल्याने गावातील पर्यटन विकासाला मोठी संधी निर्माण होईल असा विश्वास जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे यांनी व्यक्त केला. शिर्डी मतदार संघातील औरंगपूर, गोगलगांव येथील जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने गोगलगाव रस्ता आणि जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून गावातील शनी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाचा भूमिपूजन,नवीन रोहीत्र लोकार्पण कार्यक्रमा प्रसंगी सौ. विखे बोलत होत्या.

यावेळी राहाता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विवेक गुंड, जनसेवा मंडळाचे अध्यक्ष विजयराव डेंगळे, लक्ष्मण चोपडे, इंद्रभान तांबे, रामप्रसाद मगर, गोगलगांवचे सरपंच भाऊसाहेब खाडे, माणिक गोर्डे, त्र्यंबक गायकर, औरंगपूरचे सरपंच लक्ष्मीबाई वाकचौरे,मिनाक्षी वदक, ज्ञानेश्वर तांबे,साहेबराव तांबे,साहेबराव तांबे,बाळासाहेब गिरी, विविध अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधताना सौ. विखे म्हणाल्या, शिर्डी मतदारसंघांमध्ये पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणामध्ये विकास काम होत आहेत.

दळणवळणाची सुविधा निर्माण व्हाव्यात म्हणून त्यांचा नेहमीच प्रयत्न असतो.विकासाकरीता ठ निधीची उपलब्धता राज्यातील महायुती सरकारकडून होत असल्याने विकास प्रक्रीयेत आपला जिल्हा अग्रस्थानी असल्याचे त्यांनी सांगितले. रस्त्यांच्या कामांबरोबरच विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत शिर्डी मतदारसंघ अव्वल स्थानावर आहे. सर्वसामान्य जनतेला योजनांचा मोठा आधार मिळत आहे. लाभार्थ्यांच्या योजना देखील नागरिकांपर्यंत पोहोचत आहेत. विकास कामे पारदर्शक पद्धतीने व्हावेत यासाठी ग्रामस्थांनी देखील गावपातळीवर लक्ष देऊन चांगले काम कसे होईल यासाठी प्रयत्न करावेत करावे असे आवाहन त्यांनी केले.

# सिमाताईचे महिला दिनाचे शिर्डीत सेलिब्रेशन

## निमगाव ग्रामपंचायत चा पुढाकार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : देशाचे सामाजिक न्याय मंत्री ना . रामदास आठवले यांच्या सुविद्य पत्नी सीमाताई आठवले या काल शिर्डी दौऱ्यावर आल्या असता त्यांनी राहाता तालुक्यातील निमगाव ग्रामपंचायत ने आयोजित केलेल्या महिला दिनाच्या कार्यक्रमात सहभाग घेत महिला दिनाचे औचित्य साधत येथील महिलांच्या सानिध्यात महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

ना रामदास आठवले व सिमाताई आठवले काल शिर्डीत दाखल झाल्या ना.आठवले त्यांच्या कार्यक्रमात व्यस्त असताना रिपाईचे नेते चांगदेव जगताप यांनी थेट सिमाताईना निमगावातील महिला दिनाचे कार्यक्रमास येण्याची विनंती केली. त्यास तत्पर प्रतिसाद देत सिमाताई निमगावात हजर झाल्या. रिपब्लिकन पक्षाचे नेते चांगदेव जगताप परिवाराने सौ सिमा ताई आठवले यांचे त्यांच्या निवासस्थानी स्वागत केले त्यानंतर निमगाव ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयात माजी सरपंच शिल्पा कातोरे, शिर्डी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा जयश्री थोरात व विद्यमान सरपंच कैलास कातोरे, माजी उपसरपंच अजय जगताप व सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी सहभाग घेत आठवले यांनी त्यांचे स्वागत करत त्यांचा सत्कार केला.

या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य रूपाली वदक, ग्रामपंचायत सदस्य शीतल जगताप, मिनाताई जगताप, निकीता गाडेकर, बानुबाई गायकवाड, कल्पना डेंगळे, विमल थोरात, जयमाला कातोरे, अंगणवाडी सेविका सपना जाधव, मीनाक्षी वदक, वैशाली धिवर, सुशीला गाडेकर, सुनीता वदक, सुरेखा ठाकरे, आशा सेविका अश्विनी मोरे, कविता पेटारे, अश्विनी भालेराव, ज्योती पेटारे आदींसह बहुसंख्य महिलांनी सीमाताई यांचे सोबत महिला दिनाचे सेलीब्रेशन केले.



### निमगावकरांचा आदर नेहमी आठवणीत राहील -सौ. आठवले

माझा निमगावच्या ग्रामस्थांनी जे आदरतिथ्य केले ते कायम आठवणीत राहील, मी हा कार्यक्रम पाहून भारावून गेले असून ग्रामपंचायत ने केलेल्या गावच्या विकासाबाबत मी प्रभावित झाले असून येथे झालेला महिला दिन माझ्या कायम स्मरणात राहील असे प्रांजळ मत सिमाताई आठवले यांनी व्यक्त केले.

# सामान्य कार्यकर्त्यांना न्याय देण्याची तनपुरे कुटुंबीयांची भूमिका : सुखदेव बिवाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी शहर व तालुक्यातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांना नेहमीच न्याय देण्याची भूमिका माजी खासदार प्रसादराव तनपुरे व त्यांच्या कुटुंबीयांनी घेतली असून गोरगरीब कार्यकर्त्यांना संधी देण्याची त्यांची परंपरा असल्याचे मत राष्ट्रीय मानवाधिकार सुधार संघटनेचे (दिल्ली) कार्यकारिणी सदस्य सुखदेव बिवाल यांनी व्यक्त केले. राहुरी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी भाऊसाहेब मोरे यांची निवड झाल्याबद्दल राष्ट्रीय मानवाधिकार सुधार संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सुखदेव बिवाल बोलत होते. बिवाल म्हणाले की, तनपुरे कुटुंबीयांनी नेहमीच सर्वसामान्य आणि गोरगरीब कार्यकर्त्यांना पाठबळ दिले आहे. शहर व तालुक्यातील विविध लहान-मोठ्या संस्थांमध्ये सामान्य कार्यकर्त्यांना संधी देण्याची भूमिका त्यांनी कायम ठेवली आहे. त्यामुळे आगामी विधानसभेच्या पोटनिवडणुकीत माजी मंत्री प्राजक्तदादा तनपुरे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, माजी खासदार प्रसादराव तनपुरे, अरुण तनपुरे, डॉ. उषाताई तनपुरे, प्राजक्तदादा तनपुरे तसेच युवा नेते हर्ष तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी शहराच्या विकासासाठी काम करण्यात येणार आहे. शहरातील रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा, घरकुल योजना आदी प्रश्नांवर प्राधान्याने काम करून मिळालेल्या संधीचे सोने करण्याचा प्रयत्न करू, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात सुखदेव बिवाल यांच्या हस्ते नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष तानसेन बिवाल, प्रवीण गायकवाड, संदीप सरोदे, लाला सय्यद, सुरज उपदे, राहुल जाधव, संतोष त्रिभुवन, गुलशन बिवाल, शिवम बिवाल, राजू शेख, निसार पठाण, पवन उमरवाल, शिवा साळवे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एकविरा क्रीडा महोत्सवात ५६७४ महिला खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : ग्रामीण भागातील महिलांना क्रीडा क्षेत्रात व्यासपीठ मिळावे या उद्देशाने एकविरा फाउंडेशनतर्फे आयोजित महिला क्रीडा महोत्सवाला मोठा प्रतिसाद मिळत असून क्रिकेट, रस्सीखेच आणि बॅडमिंटन स्पर्धांमध्ये तब्बल ५६७४ महिला खेळाडू सहभागी झाल्या आहेत. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आणि एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

महिला दिनाच्या निमित्ताने सुरू झालेल्या या स्पर्धांना ग्रामीण महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने स्पर्धेचा कालावधी पाच दिवसांवरून सात दिवसांपर्यंत वाढविण्यात आला आहे. क्रिकेट स्पर्धेसाठी १६० महिला संघांनी सहभाग नोंदवला असून सुमारे २४०० महिला खेळाडू मैदानात उतरल्या आहेत. तसेच रस्सीखेच स्पर्धेत २५२ संघांचा तर बॅडमिंटन दुहेरी स्पर्धेत ३२७ संघांचा सहभाग आहे.

शेतीकामात गुंतलेल्या महिलांनी क्रिकेट मैदानात बॅट हातात घेऊन केलेली फटकेबाजी, चौकार-षटकारांची आतषबाजी आणि बाद झाल्यानंतर होणारा जल्लोष प्रेक्षकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. हजारो महिला प्रेक्षकांच्या उपस्थितीत रंगणाऱ्या या स्पर्धांमुळे ग्रामीण महिलांमध्ये आरोग्य, व्यायाम आणि आत्मविश्वासाबाबत जागरूकता वाढत असल्याचे डॉ. जयश्रीताई थोरात यांनी सांगितले.

# एकल महिलांच्या प्रश्नांसाठी विखे पाटील परिवार कायम सोबत : शालिनीताई विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**प्रवरानगर** : महिला ही कुटुंबाचा कणा असून तिने आपले आरोग्य जपणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एकल महिलांच्या प्रश्नांसाठी विखे पाटील परिवार नेहमीच त्यांच्या पाठीशी उभा राहिला असून शासनाच्या माध्यमातूनही त्यांना विविध प्रकारची मदत उपलब्ध होत आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त आरसीएफच्या सहकार्याने जगदंबा फाउंडेशन, साऊ एकल महिला समिती अहिल्यानगर आणि पंचायत समितीच्या एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या माध्यमातून राहाता तालुक्यात एकल महिलांसाठी आरोग्य शिबिर, रोजगार मार्गदर्शन मेळावा तसेच मोफत कडधान्य व अपघात विमा वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. शालिनीताई विखे पाटील म्हणाल्या की, शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकल महिलांना मिळवून देण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील सातत्याने प्रयत्नशील आहेत. महिलांनी विविध कौशल्ये आत्मसात करून व्यवसायाकडे वळावे, यासाठी प्रशिक्षणही देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष अशोक कुटे, समन्वयक मिलिंदकुमार साळवे, गटविकास अधिकारी विवेक गुंड, डॉ. संजय उबाळे, नारायण जाधव, अरुण मोकळ, संगीता मालकर, प्रतिभा कुलकर्णी आदींसह राहाता तालुक्यातील एकल महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# एचपीव्ही लस घेऊन युवतींनी आरोग्य सुदृढ ठेवावे : नगराध्यक्ष संधान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : कोपरगाव नगरपालिका हद्दीतील १४ वर्षे पूर्ण झालेल्या परंतु १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींनी एचपीव्ही लस घेऊन आपले आरोग्य सुदृढ ठेवावे, असे आवाहन कोपरगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष पराग संधान यांनी केले.



कोपरगाव नगरपालिकेच्या मार्गदर्शनाखाली डॉ. एपीजे अब्दुल कलाम नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, कोपरगाव येथे सोमवारी (दि. ९) एचपीव्ही व्हॅक्सिन लसीकरण मोहिमेचा शुभारंभ नगराध्यक्ष पराग संधान यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी त्यांनी उपस्थितांना एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व पटवून देत पालकांनी आपल्या मुलींना वेळेत लस देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. पराग संधान म्हणाले की, भारतातील महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगांमध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आढळते. या आजाराच्या प्रतिबंधासाठी एचपीव्ही लसीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. देशव्यापी लसीकरण मोहिमेअंतर्गत १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींना ही लस देण्यात येत असून या वयोगटातील मुलींनी वेळेत लसीकरण करून घेणे गरजेचे आहे. यामुळे भविष्यात गंभीर आजारांपासून संरक्षण मिळू शकते.

यावेळी उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, विद्याताई सोनवणे, अनिल आव्हाड, रवींद्र कथले, संतोष शिंदे, कैलास मंजुळ, स्वप्नील मंजूळ, फिरोज पठाण, डॉ. गायत्री कांडेकर, डॉ. अमोल अजमेरे, डॉ. प्रियंका देशमुख, डॉ. आकाश तारगे यांच्यासह आरोग्य केंद्राचे कर्मचारी व आशा सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.


## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/५५/२०२६
नेवासा दिनांक. २३/०२/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-बाबासाहेब मधुकर बेल्हेकर रा. गणेशवाडी ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी कै. इंदिराबाई यादव बेल्हेकर यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म- मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यु नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१., मृत्यु नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-कै. इंदिराबाई यादव बेल्हेकर, गावाचे नाव-गणेशवाडी, मृत्यु दिनांक-०९/१०/१९८४ करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

(शिक्का)

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहिर नोटीस

**ॲड. एस. ए. हासे**
रा. लोहे मळा, कासारवाडी,
संगमनेर अकोले रोड,
इंद्रप्रस्थ लॉन्सच्या पाठीमागे,
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
मोबा. ९६२३३७७८२४
दि.१०/०३/२०२६.

तमाम लोकांस व विशेषतः **महेश विश्वासराव मोरे,** रा. घर क्र. १४, अ विंग, मोरया हाईट, मालदाड रोड, संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर, शिवाय रा. माळेगाव पठार, पो. घारगांव ता. संगमनेर जि. अहिल्यानगर, शिवाय जिजामाता प्राईड, घुलेवाडी फाटा, गुंजाळवाडी ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांस कळविण्यात येते की,

आमचे अशिल **भीमराज कारभारी सांगळे**, रा. मु.पो. ओझर रस्ता, हंगेवाडी ता. संगमनेर, जि.अ.नगर यांनी दि. २८/०२/२०२६ रोजी तुम्हास तुमचे खाते असलेल्या एच.डी.एफ. सी. बँक शाखा संगमनेर या बँकेचा ०००२४१ हा तुम्ही सही केलेला रक्कम रु. १,००,०००/- किंमतीचा दि. २३/०१/२०२६ रोजीचा चेक तुमचे खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे अनादरीत झालेला असल्याने सदर चेकमधील रक्कम रु. १,००,०००/- मागणी करीता तुम्हास ॲड. एस.ए. हासे, संगमनेर यांचे मार्फत तुमच्या नमुद सर्व पत्यांवर मागणी नोटीस पाठविलेली होती. परंतु वर उल्लेखीत कोणत्याही पत्यावर तुम्ही मिळुन आला नाहीत. तुमच्याशी संपर्कही होत नाही. त्यामुळे सदर जाहीर नोटीसीने तुम्हास कळविण्यात येते की, वर उल्लेखीत चेक मधील नमुद रक्कम रु. १,००,०००/- सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन कायद्याचे मुदतीत आमचे अशिलांना आणुन द्यावी अन्यथा आमचे अशिल तुमच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करतील. त्याचे सर्व परिणामांची जबाबदारी तुमची राहील. ता.१०/०३/२०२६.

(शिक्का)

**ॲडव्होकेट**

## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक जन्म-मृत्यु एसआर-२२४/२००५
नेवासा दिनाक २३/०१/२०२६

अर्जदार श्री श्रीम-नवनाथ अण्णासाहेब चौधरी रा. कांगोणी ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. लक्ष्मीबाई एकनाथ चौधरी, यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यू नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, मृत्यू नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-लक्ष्मीबाई एकनाथ चौधरी, गावाचे नाव-कांगोणी, मृत्यू दिनांक-०१/०४/२०१२ करिता या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

(शिक्का)

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## पान १ वरुन

### घरगुती गॅसला प्राधान्य, नंतर खते, उद्योग आणि व्यावसायिक पुरवठा

आला आहे. या आदेशानुसार गॅस पुरवठा प्राधान्याने कोणत्या क्षेत्रांना दिला जाईल यासाठी चार स्वतंत्र श्रेणी निश्चित करण्यात आल्या आहेत.

प्राधान्य श्रेणी ३ मध्ये चहा उत्पादन उद्योग आणि राष्ट्रीय गॅस ग्रीडशी जोडलेले इतर औद्योगिक ग्राहक यांचा समावेश आहे. या उद्योगांना त्यांच्या मागील सहा महिन्यांच्या सरासरी वापराच्या सुमारे ८० टक्के गॅस पुरवठा केला जाणार आहे. प्राधान्य श्रेणी ४ अंतर्गत सिटी गॅस डिस्ट्रीब्युशन नेटवर्कद्वारे गॅस घेणारे औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहक यांना त्यांच्या सरासरी वापराच्या सुमारे ८० टक्के गॅस उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

प्राधान्य क्षेत्रांना पुरेसा गॅस मिळावा यासाठी काही गैर-प्राधान्य क्षेत्रांमध्ये गॅस पुरवठ्यात कपात केली जाणार आहे. यामध्ये पेट्रोकेमिकल उद्योग, उच्च दाब आणि उच्च तापमानावर गॅस वापरणारे उद्योग यांचा समावेश असेल. आवश्यक असल्यास वीज प्रकल्पांनाही गॅस पुरवठ्यात कपात सहन करावी लागू शकते. तसेच तेल शुद्धीकरण कारखान्यांचा गॅस वापरही मागील सहा महिन्यांच्या सरासरी वापराच्या सुमारे ६५ टक्क्यांपर्यंत मर्यादित केला जाऊ शकतो.

या आदेशाची अंमलबजावणी गॅस अथोरिटी ऑफ इंडिया लिमिटेड यांच्या समन्वयातून केली जाणार आहे. गैर-प्राधान्य क्षेत्रातून वळवलेल्या गॅसचे दर आणि बिल पीपीएसी निश्चित करेल. नैसर्गिक वायूचे उत्पादन, आयात, विपणन आणि वाहतूक करणाऱ्या सर्व कंपन्यांना ओएनजीसी, रिलायन्स इंडस्ट्रीज, ऑल इंडिया लिमिटेड, वेदांता, जेल, एलएनजी टर्मिनल ऑपरेटर, पाइपलाइन ऑपरेटर आणि सिटी गॅस वितरण कंपन्यांना या नव्या गॅस वितरण नियमांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सरकारने स्पष्ट केले आहे की या आदेशातील तरतुदी विद्यमान गॅस सेल एग्रीमेंट पेक्षा वरचढ असतील.

### कर थकबाकीमुळे श्रीरामपूरचे जैन स्थानक सील

भरल्याने श्रीरामपूर नगरपालिकेने येथील जैन समाजाचे सांस्कृतीक भवन सिल केले. त्यामुळे जैन समाजासह व्यापारी तसेच शहरातील नागरिकांत खळबळ उडाली आहे.

अर्धवट सील का? शहराच्या मध्यवस्तीत नगरपालिकेच्या शेजारी असलेली स्थानकवासी जैन संघाची मोठी इमारत आहे. या इमारतीचे काही काम अद्याप बाकी आहे. मात्र ती जैन समाजाच्या वापरात आहे. पण एक धार्मिक सामाजिक समारंभ या इमारतीत होतात. जर या इमारतीचा लाखो रुपयांचा तर थकलेला असेल तर पालिकेने तिचा काही भाग खुला का सोडला? इमारत पूर्णपणे सील का केली नाही? सामान्य माणसाचे घरदार, दुकाने सील केली जातात, मग अशा मोठ्या मालमत्तांना काही भाग खुला सोडण्याची सुट का दिली जाते? असा प्रश्न सामान्य नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

### गॅस टंचाई : अहिल्यानगरमधील २५ टक्के उद्योगांना फटका

त्यापैकी उत्पादन ठप्प झालेल्या कारखान्यातील संख्या दीड हजारावर असावी. उत्पादनासाठी तातडीने औद्योगिक गॅसचा वापर बंद करून अन्य पर्यायी मार्गांचा अवलंब, जसे की डिझेल किंवा विजेवरील इंजिन भट्टी यासारख्या पर्यायी मार्गाचा अवलंब करणे शक्य नाही. कारण गॅस वापरावरील यंत्रणा कारखान्यातून उभारण्यात आलेली असते. पर्यायी यंत्रणा लगेचच उभारणी करणे शक्य नाही. तसे केल्यास उत्पादनाच्या खर्चात वाढ होऊन होणार आहे. ते लघुउद्योजकांना परवडणारे नाही. क्रूड ऑइलच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. प्लास्टिक उत्पादनासाठी क्रूड ऑइलचा वापर केला जातो. त्यामुळे प्लास्टिकच्या किमतीमध्ये १२० रुपयावरून १९० रुपये प्रति किलो अशी वाढ झाली आहे. उत्पादन खर्च वाढला आहे. मात्र 'जॉब वर्क' करणाऱ्या कारखान्यांनी मोठ्या कंपन्यांशी पुरवठ्याचे करार पूर्वीच केले असल्याने त्यांना उत्पादन खर्च वाढला तरी जुन्याच दराने पुरवठा करावा लागणार आहे. याशिवाय विविध प्रकारच्या कच्च्या मालाच्या दरामध्येही मोठी वाढ झाली आहे. त्याचा भूर्दंड लघुउद्योजकांना सहन होणारा नाही. त्यातून उद्योजकांच्या 'कॅश फ्लो' वर परिणाम होणार असल्याकडे लक्ष वेधले जात आहे. शुक्रवारी जिल्हाधिकाऱ्यांना भेटणार औद्योगिक वापराच्या गॅसचा पुरवठा बंद झाल्याने लघुउद्योजकांच्या व कामगारांच्या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी शिष्टमंडळ शुक्रवारी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन घेणार आहे. आज जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतु वेळ मिळाली नाही. -जयद्रथ खकाळ, अध्यक्ष, आमी संघटना.

### एका महिन्यात मोजणी करणे बंधनकारक

राबवण्यात येणार आहे. प्रत्येक महसूल विभागातील ३ तालुके याप्रमाणे एकूण १८ तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. येथे खाजगी भूमापक आणि शासकीय अधिकारी यांची संयुक्त टीम काम करेल. मोजणीचे नकाशे, पंचनामे आणि अक्षांश-रेखांश, तपशील थेट प्रणालीवर अपलोड केला जाईल. मोजणीचे प्रमाणीकरण मात्र उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयामार्फतच होईल. कामात दोष आढळल्यास खाजगी भूमापकावर दंडात्मक आणि शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. शासकीय जमिनींवरील अतिक्रमण, एकत्रीकरण किंवा पुनर्मोजणीचे काम मात्र खाजगी भूमापकांना करता येणार नाही.

## राहाता येथे गर्भलिंग निदान व स्त्री भ्रूणहत्येप्रकरणी कठोर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहाता :** शिर्डी मतदारसंघातील राहाता येथे गर्भलिंग निदान व स्त्री भ्रूणहत्या करण्यासाठी राज्यभरातून लोक येत असल्याची बाब अत्यंत लाजिरवाणी व संतापजनक असल्याचे सांगत संबंधित डॉक्टर व केंद्रांवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी भाजप नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची मुंबई येथे भेट घेऊन केली. डॉ. पिपाडा यांनी यावेळी राहाता तालुक्यात काही ठिकाणी बेकायदेशीररीत्या गर्भलिंग निदान व स्त्री भ्रूणहत्या होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर येत असल्याचे आरोग्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. या प्रकारामुळे समाजात अत्यंत चुकीचा संदेश जात असून मुलगी जन्माला येण्याआधीच तिचे अस्तित्व संपविण्याचा हा अमानुष प्रकार तातडीने थांबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच अशा बेकायदेशीर कृत्यांमुळे राहाता शहरासह शिर्डी मतदारसंघाची बदनामी होत असून प्रशासनाने विशेष पथक नेमून संबंधित रुग्णालये, सोनोग्राफी केंद्रे व डॉक्टरांची सखोल चौकशी करावी आणि दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली. स्त्री भ्रूणहत्या रोखणे आणि समाजातील मुलींचे प्रमाण टिकविणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून अशा अमानुष कृत्यांना कोणतीही माफी दिली जाणार नाही, असेही डॉ. पिपाडा यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागाला चौकशीचे निर्देश दिले असून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले.

> राज्यात सुरू असलेल्या गर्भलिंग निदान व स्त्री भ्रूणहत्येच्या घटनांबाबत आ. प्रशांत बंब यांनीही विधानसभेत तीव्र चिंता व्यक्त केली. जन्माला येणाऱ्या बाळाचा हा एक प्रकारे खून असून संबंधित डॉक्टरांवर खुनाचे गुन्हे दाखल करण्याची गरज असल्याचे त्यांनी सभागृहात सांगितले.

# वैजापूर पंचायत समितीवर शिवसेनेचा भगवा

## सेनेच्या वंदना शिंदे सभापती; उपसभापती सोनाली जाधव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** वैजापूर पंचायत समितीच्या सभापतीपदी संवंदगाव गणातील शिवसेना सदस्या वंदना बाळू शिंदे यांची तर उपसभापतीपदी शिवसेना पुरस्कृत शिऊर गणातील सोनाली किशोर जाधव यांची मंगळवारी बिनविरोध निवड करण्यात आली. सभापती पद हे अनुसूचित जातीच्या महिलांसाठी पाच वर्षासाठी राखीव आहे.

सभापती पदासाठी महालगाव गणातील भाजपच्या सदस्या शीतल राहुल आल्हाट व उपसभापती पदासाठी लाडगाव गणातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राहुल बाबासाहेब लांडे यांनी आपले उमेदवारी अर्ज पिठासीन अधिकारी डॉ अरुण जऱ्हाड यांच्याकडे दाखल केले होते. मात्र, दिलेल्या वेळेत त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने वंदना शिंदे यांची सभापती म्हणून तर सोनाली जाधव यांची उपसभापती म्हणून निवड झाल्याचे डॉ जऱ्हाड यांनी घोषित केले. या सभेला सर्व सोळा सदस्य उपस्थित होते.

सोळा सदस्य असलेल्या वैजापूर पंचायत समितीत शिवसेना सात सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस चार, भाजप दोन, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) एक, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) एक व अपक्ष एक असे संख्याबळ आहे. शिवसेनेचे आमदार रमेश पाटील बोरनारे, माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगांवकर, जिल्हा प्रमुख बाबासाहेब जगताप व माजी नगराध्यक्ष साबेरखान यांच्या मार्गदर्शनाखाली सेनेच्या सभापती व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या अप सभापतीची निवड झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी जय भवानी जय शिवाजीच्या घोषणा देत सभागृह दणाणून सोडले.




तब्बल आठ वर्षाहून अधिक कालावधीनंतर महत्वाचे पद असलेल्या या खुर्चीवर पदाधिकारी विराजमान होणार असल्याने पंचायत समितीत चैतन्याचे वातावरण बघायला मिळाले. आमदार रमेश बोरनारे यांच्यासह वरिष्ठ नेत्यांनी नव निर्वाचित पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले.

याप्रसंगी रामहरी जाधव, राजेंद्र साळुंके, सुभाष तांबे, भागीनाथ मगर, दीपकसिंह राजपूत, श्रीराम गायकवाड, हुसेन शेख, सुनील कदम, अंकुश हिंगे, प्रकाश शेळके, अमोल बावचे, पारस घाटे, महेश बुनगे दिपक साळुंके, कमलेश आंबेकर,आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिर्डी मतदारसंघातील सात रस्त्यांसाठी अर्थसंकल्पात २२ कोटींची तरतूद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** महायुती सरकारने नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पात शिर्डी विधानसभा मतदारसंघातील सात महत्त्वपूर्ण रस्त्यांच्या विकासासाठी २२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

संगमनेर, राहाता आणि कोपरगाव या तीन तालुक्यांना जोडणाऱ्या प्रमुख मार्गांच्या विकासासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा झाल्यामुळे सुमारे २६.९० कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या विकासासाठी हा निधी उपलब्ध झाला आहे.

यामध्ये संगमनेर-नेवासा राज्य मार्गाच्या सुधारणेसाठी तसेच बंदिस्त गटारांच्या कामासाठी ३ कोटी ५० लाख रुपये मंजूर झाले आहेत. दाढ बुद्रूक-हसनापूर-लोणी-आडगाव-केलवड-नांदुर्खी या रस्त्यासाठी २ कोटी रुपये तर पाथरे-लोणी बुद्रूक (म्हसोबा मंदिर परिसर)-पिंपरी निर्मळ-चोळकेवाडी या महत्त्वपूर्ण मार्गासाठी ६ कोटी १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

तसेच आश्वी खुर्द ते दाढ खुर्द या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी ३ कोटी रुपये मंजूर झाले असून संगमनेर-जोर्वे-आश्वी-दाढ-कोल्हार या रस्त्यासाठी १ कोटी २० लाख रुपये मंजूर झाले आहेत.

सावळीविहीर ते रांजणगाव देशमुख या विमानतळ मार्गासाठी ५ कोटी रुपये तर कोल्हार बुद्रूक -राजुरी-गोल्हारवाडी-वाकडी-पुणतांबा या रस्त्यासाठी १ कोटी २० लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे.या निधीमुळे संगमनेर, राहाता व परिसरातील गावांमधील दळणवळण सुधारून ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे विखे यांनी सांगितले.

# कर्तृत्ववान महिलांचा 'गुणगौरव सोहळा' उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** स्त्री शक्तीचा सन्मान करणे ही आपली संस्कृती आहे, आणि जेव्हा या शक्तीचा गौरव होतो, तेव्हा संपूर्ण समाज प्रगत होत असतो. याच भावनेतून जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वैजापूर नगर परिषद आणि महिला व बाल कल्याण विभाग, राष्ट्रीय नागरी आजीविका अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील विविध क्षेत्रांत ठसा उमटवणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा भव्य 'गुणगौरव सोहळा' अत्यंत उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे समाजातील प्रत्येक स्तरावर काम करणाऱ्या महिलांचा झालेला सन्मान. नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, उपाध्यक्ष शेख रियाज आणि मुख्याधिकारी भागवत बिघोत यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला. केवळ उच्चशिक्षित किंवा मोठ्या पदावरील महिलाच नव्हे, तर समाजाचा कणा असलेल्या कचरावेचक महिला आणि सफाई कामगार महिलांचाही तितक्याच सन्मानाने सत्कार करण्यात आला. शैक्षणिक,




सामाजिक, पोलीस प्रशासन, वकिली, वैद्यकीय क्षेत्र, गृहउद्योग आणि महिला बचत गट अशा एकूण ६० महिलांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. पर्यावरण रक्षणाप्रती महिलांची असलेली कटिबद्धता या सोहळ्यात प्रकर्षाने दिसून आली. 'एक पेड मां के नाम' आणि 'अमृत २.०' या उपक्रमांतर्गत तब्बल ४४०० झाडे लावून त्यांचे यशस्वीरित्या संगोपन करणाऱ्या महिलांचा विशेष गौरव करण्यात आला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी महिलांनी उचललेले हे पाऊल भविष्यातील पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरणार आहे. या कार्यक्रमाचे नेटके आयोजन माजी नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी यांनी केले होते. त्यांच्या पुढाकाराने शहरात महिला संघटन आणि सक्षमीकरणासाठी एक मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. या सोहळ्यास महिला व बाल कल्याण सभापती संगीता राजुसिंग राजपूत, सुमेय्या बक्ष शेख, मोनाली खैरे, पूजा त्रिभुवन, जयश्री चौधरी, दीपा राजपूत, लता वाणी, सुरेखा घाटे, ज्योती जोशी, सुवर्णा ठोबरे, जयश्री राजपूत, कविता शिंदे आणि मनिष गणवीर सर यांसारख्या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी आपल्या भाषणातून महिलांना आत्मनिर्भर होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने 'सोनचिरेया' उपजीविका केंद्राच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे भव्य प्रदर्शनही भरवण्यात आले होते.

# कौशल्य प्रशिक्षणाचे प्रवरा मॉडेल विकसित भारतासाठी उपयुक्त : डॉ. सोनवणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** लोकल ते ग्लोबल शिक्षणासाठी कौशल्य प्रशिक्षणाचे प्रवरा शिक्षण संस्थेने तयार केलेले मॉडेल विकसित भारतासाठी मार्गदर्शक ठरेल असे गौरवोद्गार यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी काढले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजना आणि लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षकांसाठी विकसित भारत २०४७ या विषयांवर आयोजित चर्चासत्रात डॉ. सोनवणे बोलत होते.

यावेळी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे, इंदोर येथील येथील डॉ. सुनिता जोशी, पुणे येथे डॉ.भाग्यश्री दुधाडे, संस्थेचे शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, कॅम्प संचालक डॉ. महेश खर्डे, प्राचार्य डॉ. सचिन भोसले, डॉ.किरण चेचरे आदींसह विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधक, शिक्षक उपस्थित होते. यावेळी बोलतांना डॉ. सोनवणे म्हणाले, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे, पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागात सुरू झालेले काम विकसित भारताच्या संकल्पनेला पूरक आहे. मंत्री राधाकृष्ण विखे यांनी सहकार, कृषी, आरोग्य आणि ग्रामीण विकासाचे काम पुढे घेवून जाण्यासाठी केलेले यशस्वी प्रयत्न या भागातील विकासाचे रोल मॉडेल असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. सुस्मिता विखे म्हणाल्या विकसित भारत ही संकल्पना प्रवरेमध्ये सहकाराच्या माध्यमातून सुरू करण्यात आले. यासाठी १९६४ पासून ग्रामीण शिक्षणामध्ये प्रवरेने आपले योगदान देत असताना चांगले शिक्षण, चांगल्या पायाभूत सुविधा या ग्रामीण भागासाठी दिल्याने आज माजी विद्यार्थी हे जागतिक पातळीवर पोहोचले आहेत. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक डॉ. सचिन भोसले यांनी करतांना प्रवरेमध्ये सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रियंका शिंदे आणि आदिनाथ रणमाळे यांनी तर आभार प्रा. निशा खरात यांनी मानले.



## वडिलांचे कलेक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण

### आयएएस ऋतुजा गायकवाड यांचा नान्नज दुमाला येथे सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** यूपीएससी परीक्षेत १०६ वा क्रमांक मिळवून आयएएस अधिकारी बनलेल्या ऋतुजा गायकवाड यांचा नान्नज दुमाला येथे ग्रामस्थांच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना ज्या मातृभूमीत जन्म झाला त्या गावाशी माझी नाळ कायम जोडलेली राहील आणि भविष्यात गावासाठी शक्य ते सहकार्य करेन, असे प्रतिपादन ऋतुजा गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच भीमराज चत्तर होते. व्यासपीठावर सत्कारमूर्ती ऋतुजा गायकवाड, वडील अशोक गायकवाड, आई संगीता गायकवाड, सेवानिवृत्त एलआयसी अधिकारी सखाराम माळी, विनायक शेठ गुंजाळ, अनिल मंडलिक, बाळासाहेब भरीतकर, सुदाम आनप, केंद्रप्रमुख यु. के. गायकवाड, पांडूशेठ फड, किसन चत्तर आदी मान्यवर उपस्थित होते. ऋतुजा गायकवाड म्हणाल्या की, यूपीएससी परीक्षेत मिळालेल्या यशाचे संपूर्ण श्रेय माझ्या आई-वडील व कुटुंबीयांना जाते. माझ्या वडिलांची अधिकारी होण्याची इच्छा होती; मात्र त्यांना त्यात यश आले नाही. तरीही ते नेहमी मला प्रोत्साहन देत आणि एक दिवस मी कलेक्टरचा बाप होईल, असा विश्वास व्यक्त करत. आज त्यांचे ते स्वप्न पूर्ण झाल्याचा आनंद असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी ऋतुजा गायकवाड यांची सजवलेल्या रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात भीमराज चत्तर म्हणाले की, ऋतुजा गायकवाड यांचे यश नान्नज दुमाला गावासाठी अभिमानास्पद असून आता गावाची ओळख अवर्षणग्रस्त गाव म्हणून नव्हे, तर कलेक्टरचे गाव म्हणून होईल. कार्यक्रमासाठी ग्रामस्थ, नातेवाईक व कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नशिबाची परिक्षा

**बुधवार दि . ११ मार्च २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १८० २७० ९०० | ९-१ | १४६ १२८ ११९ | जोड ९०-३१-२४-५७-१८ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १९० १४५ ११८ | ०-६ | १२३ १५० ११४ | जोड ०३-२६-४५-१९-६७ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| २६० ३५० ११६ | ८-९ | १२६ १८० ११७ | जोड ८१-५९-७४-२०-९६ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## निधन वार्ता

### नानासाहेब खर्डे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** नेवासा फाटा येथील गाडेनगर वसाहतीतील प्रगतशील शेतकरी नानासाहेब दामोधर खर्डे (वय ६१) यांचे नुकतेच अकस्मात निधन झाले. नानासाहेब खर्डे यांच्या पश्चात आई, पत्नी, चार मुली,एक भाऊ असा परिवार आहे.इंजिनियर संजय खर्डे यांचे ते बंधू तर दिपाली राजेंद्र पटारे, पल्लवी पोपटराव घावटे, अमृता सोमनाथ आढाव, गौरी रोहन तनपुरे यांचे ते वडील होते.

### सीताबाई हारदे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**ताहाराबाद :** राहुरी तालुक्यातील ताहाराबाद येथील गं.भा.सीताबाई लालपाटील हारदे (वय-१०५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पाश्चात ३ मुले,३ मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. ताहाराबाद सेवा संस्थेचे माजी अध्यक्ष रामदास हारदे, पोपट व दत्तात्रय हारदे यांच्या त्या मातोश्री होतं.

## नेवासा तालुक्यातील रस्त्यासाठी २५ कोटी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**सोनई :** महायुती सरकारने नेवासा तालुक्यातील गावाला जोडणाऱ्या रस्त्यासाठी सुमारे २५ कोटी रुपयाचा निधी मंजूर करून कामाचा धडका झाल्याची माहिती नेवासा महायुतीचे आमदार विठ्ठल राव लंघे यांनी दिली. नेवासा तालुक्यातील प्रामुख्याने कुकाना, शिरसगाव, सलबातपूर, खामगाव, नेवासा, खडका, माका, देडगाव, जेऊर, वरखेड, गोपाळपूर, चांदा, महालक्ष्मी हिवरा,माका, खेडले परमानंद, सोनई, घोडेगाव, तिसगाव, बेलपिंपळगाव, घोडेगाव, इमामपूर, पाचेगाव, वाटापुर, गोमळवाडी, गणेशवाडी काळेवाडी, आदी रस्त्यासाठी एकूण २५ कोटी रुपयांचा निधी रस्त्याच्या कामासाठी मंजूर झाला आहे. या दरम्यान नाबार्ड अंतर्गत येणाऱ्या जळके खुर्द येथील फुलाच्या कामासाठी ५ कोटी रुपये मंजूर झाले आहे. या कामाच्या निधीमुळे सोयी -सुविधा भक्कम करण्यासाठी प्रयत्न राहणार असून जागेवरच समस्या सोडून या पार्श्वभूमीवर सरकारकडे आग्रही राहणार असून आगामी रस्ते, पूल, आदी बाबद ग्रामीण भागातील नाळ जोडण्याचे कार्य चालू राहणार आहे.यामुळे तालुक्यातील रस्ते विकास होऊन सर्वसामान्यांना प्रवास करण्यास सोपे होणार आहे.

## गंगापूर पंचायत समितीच्या सभापतीपदी चव्हाण उपसभापती हिवाळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदासाठी झालेल्या निवडणुकीत महायुतीने आपले वर्चस्व कायम ठेवले. सभापतीपदी भाजपच्या कविता रविंद्र चव्हाण यांची तर उपसभापतीपदी शिवसेना शिंदे गटाचे चे राजेश्वर कल्याण हिवाळे यांची निवड झाली आहे. मंगळवार (१० मार्च) रोजी दुपारी २ वाजता पंचायत समिती सभागृहात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. ही बैठक निर्वाचन अधिकारी विजय राऊत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.सभापती पदासाठी भाजपच्या कविता रविंद्र चव्हाण आणि उबाठा गटाचे रावसाहेब मोहन टेके यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. उपसभापती पदासाठी शिवसेना शिंदे गटाचे राजेश्वर कल्याण हिवाळे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदीप सोनवणे यांनी अर्ज दाखल केले होते. मात्र प्रदीप सोनवणे यांनी आपला अर्ज मागे घेतल्याने राजेश्वर हिवाळे यांची उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाली.सभापती पदासाठी हात वर करून मतदान घेण्यात आले. यामध्ये कविता चव्हाण यांना १३ मते मिळाली, तर रावसाहेब टेके यांना ५ मते मिळाली. या निवडणूक प्रक्रियेसाठी तहसीलदार नवनाथ वगवाड, गटविकास अधिकारी सुहास वाकचौरे, नायब तहसीलदार सागर वाघमारे, सहायक गटविकास अधिकारी अक्षय भालेकर तसेच विस्तार अधिकारी मधुकर चव्हाण, अशोक घोडके,अशोक पाटेकर आणि संजय काळे यांनी सहकार्य केले.यावेळी पोलिस निरीक्षक कुमारसिंग राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.




### नावात बदल

माझे लग्न पूर्वीचे नाव नगीना बेगम तमिजुद्दीन शेख असे होते. माझे लग्नानंतर ते नाव बदलून नगीना सय्यदलाल सय्यद असे झाले आहे. दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून अन्य दुसरी व्यक्ती नाही.
प्रतिज्ञापत्र क्र.
२ ५ ५ २ २ ४ २ ०
१२६८१००१८३८४१
दिनांक -९/३/२०२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# चिचोंडीत सरपंचाच्या अटकेसाठी 'रास्ता रोको'

## तडीपारीचा प्रस्ताव पाठवा : प्राजक्त तनपुरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**करंजी** : शालेय साहित्य वाटपाचा पवित्र कार्यक्रम आटोपल्यानंतर भगवान फुलमाळी आणि भास्कर आटकर यांच्यावर झालेल्या अमानुष आणि जबरी मारहाणीच्या घटनेने पाथर्डी तालुका हादरला आहे. या घटनेला १० दिवस उलटूनही मुख्य आरोपी अद्याप अजूनही मोकाट असल्याने चिचोंडी परिसरात संतापाची लाट उसळली आहे.आरोपींना तात्काळ अटक करा आणि त्यांच्यावर तडीपारीची कारवाई करा या मागणीसाठी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलनादरम्यान बोलताना माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी प्रशासनावर कडक शब्दांत ताशेरे ओढले.


चिचोंडी ता.पाथर्डी येथे रस्ता रोको दरम्यान बोलताना प्राजक्त तनपुरे
**(छायाचित्र : तुळशीदास मुखेकर )**

तनपुरे म्हणाले घटनेला १० दिवस झाले तरी आरोपी राजरोसपणे गावात फिरत आहेत,मग पोलिसांना ते का दिसत नाहीत?आरोपींना राजकीय पाठबळ मिळत असल्याचा संशय येत असून,गुन्हा दाखल करतानाही टाळाटाळ करण्यात आली.जर दोन दिवसांत आरोपींना अटक झाली नाही,तर मी याच रस्त्यावर झोपून आंदोलन करेन. मग पोलिसांनी मला गाडीत घालूनच नेलं पाहिजे, मी सामान्य जनतेच्या हितासाठी मागे हटणार नाही असा आक्रमक इशाराही त्यांनी यावेळी दिला. गावातील मुख्य आरोपी कमरेला कट्टा लावून फिरत असून सर्वसामान्य जनतेला धमकावत असल्याचा खळबळजनक आरोप ग्रामस्थांनी यावेळी केला.माजी सभापती संभाजी पालवे यांनीही प्रशासनाचा निषेध करत म्हटले की, सामान्य माणसावर होणारी दडपशाही आणि दादागिरी आम्ही खपवून घेणार नाही.भगवान आणि भास्कर यांच्या केसालाही धक्का लागला तर याद राखा अशा शब्दात संभाजी सभापती संभाजी पालवे यांनी संताप व्यक्त केला.

तीन तास चाललेल्या या आंदोलनामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक संदीप ढाकणे यांनी आंदोलकांशी चर्चा केली. आतापर्यंत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, उर्वरित आरोपींच्या सीडीआर (उऊ्र) द्वारे लोकेशन मिळवण्याचे काम सुरू आहे. दोन दिवसांत सर्व आरोपींना अटक करून त्यांच्यावर तडीपारीचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवू असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

या आंदोलनात माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्यासह माजी सभापती संभाजी पालवे,राष्ट्रवादीचे तालुका उपाध्यक्ष अंबादास डमाळे,माजी पोलीस निरीक्षक विठ्ठल गायकवाड,मिरी-तिसगाव योजनेचे उपाध्यक्ष भीमराव सोनवणे,सातवडचे सरपंच राजेंद्र पाठक,शेतकरी नेते राजेंद्र गीते,युवानेते राजेंद्र दगडखैर,जालिंदर वामन,सतिश क्षेत्रे,सामाजिक कार्यकर्ते संतोष गरुड,राजेंद्र पवार, विजय आव्हाड,संजय आव्हाड,ओंकार आव्हाड,भागिनाथ गवळी,राजू शेख,चंद्रकांत आव्हाड, राजेंद्र आव्हाड,प्रल्हाद आव्हाड,दिनकर आव्हाड,तसेच पीडित भगवान फुलमाळी व भास्कर आटकर व त्यांचे सहकुटुंब रस्त्यावर उतरले होते. प्रशासनाच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती आगरकर,संदीप ढाकणे,पीएसआय ढगे,मंडल अधिकारी प्रीती शिंदे तलाठी इम्रानखान इनामदार उपस्थित होते.

## द•ख•ल

### निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये महिला दिन साजरा



**ढोरजळगांव** : जागतिक महिला दिनानिमित्त निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करून महिला सन्मानाचा संदेश देण्यातला. या कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त शिक्षिका भालसिंग, पोलिस कॉन्स्टेबल प्रियंका शिरसाट आणि डॉ. बाफना या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी महिला सशक्तीकरणावर आधारित भाषणे, गीते व नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून शाळेचे प्राचार्य दत्तात्रय मोरे यांनी आपल्या मनोगतातून महिलांचा सन्मान करावा, तसेच या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना महिलांच्या कर्तुत्वाची प्रेरणा मिळेल असे मार्गदर्शन करून सर्व महिला शिक्षकांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल पवार, प्रास्ताविक बाळू निळ यांनी केले. आभार रामजोत जांगीड़ यांनी मानले.

### शहरटाकळी विद्यालयात माता पालक मेळावा संपन्न



**शहरटाकळी** : मुलांवर चांगले संस्कार करणे हे पालकांचे आद्य कर्तव्य असून शिक्षक आपले कार्य अविरतपणे करत असतात. त्यामुळे पालकांनीही पाल्यांच्या भावना समजून घेत त्यांना योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आशा कानडे यांनी केले. शेवगाव तालुक्यातील कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित माता-पालक मेळाव्यात त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. यावेळी त्यांनी विशेषतः मुलींच्या आरोग्य आणि आहाराबाबत जागरूकता निर्माण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. मुलींना मानसिक स्थैर्य देणे, त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यांच्याशी संवाद ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य सुनील जायभाये, कमल तुळसे, अपर्णा जोशी, मनीषा जगधने, पूनम खरड, शितल खरड, विद्या करवंदे, अर्चना माळवदे, सुरेखा पंडित, शामल काकडे, मंदा बारगळ, रेखा मेरड, सरला विश्वंभर, मुक्ता घुणे, अनिता झिरपे, सोनाली सूसे, रीना हांडे, निलोफर शेख, हरिश्चंद्र मडके, शशिकांत काकडे यांच्यासह सर्व महिला शिक्षिका व मोठ्या संख्येने माता-पालक उपस्थित होते.

# बारडगावचा तरुण बनला आयआरएस अधिकारी

## पहिल्या नोकरीचा राजीनामा देत दुसऱ्यांदा यूपीएससीची परीक्षा उत्तीर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : बीएसएफमध्ये असिस्टंट कमांडट पदावर असताना उच्चपदस्थ अधिकारी म्हणूनच काम करायचे या ध्येयाने पेटलेल्या सुनील कदम या कर्जत तालुक्यातील युवकाने राजीनामा देत पुन्हा यूपीएससी परीक्षा देत नुकत्याच झालेल्या परीक्षेत ७२७ रँक पटकावत आयआरएस पदासाठी पात्र ठरला. सुनील कदम बारडगाव दगडी (ता.कर्जत) येथील युवकाने स्वताची जिद्द ठेवत सातत्य, चिकाटी आणि कठोर मेहनतीने आपले स्वप्न पूर्ण केले. सुनील कदम बारडगाव दगडी (ता.कर्जत) येथील शेतकरी कुटुंबातला युवक.

सुनील याने यापूर्वी देखील यूपीएससी परीक्षेत यश मिळवत बीएसएफमध्ये असिस्टंट कमांडट पदावर आपले नाव कोरले होते. मात्र मनात ध्येय आणि जिद्द प्रशासकीय सेवेत उच्च पदस्थ अधिकारी म्हणून काम करण्याचा त्यांचा मानस त्यांना या सेवेत स्वस्थ बसू देत नसल्याने त्यांनी या पदाला रामराम ठोकत राजीनामा दिला. त्यांच्या या निर्णयाचे अनेकांनी त्यावेळी खिल्ली देखील उडवली. मात्र सुनील कदम यांनी पुन्हा नव्याने यूपीएससी परीक्षा देण्याचा धाडसी निर्णय घेतला. नुकत्याच झालेल्या यूपीएससी परीक्षेत त्यांनी ७२७ रँक पटकावत आयआरएस पदावर आपले नाव कोरले. मनात जिद्द, चिकाटी आणि त्यासाठी घेतलेले कठोर परिश्रम काय इतिहास घडवू शकतात याची प्रचिती ग्रामीण भागातील तरुणांना दिली.



बारडगाव सारख्या खेडेगावातून येत एकदा नव्हे तर तब्बल दोन वेळा केंद्रीय लोकसेवा आयोगाची कठीण परीक्षा उत्तीर्ण करणे त्यांचा हा यशस्वी प्रवास सर्वसामान्य कुटुंबासाठी प्रेरणा ठरत आहे. त्यांच्या या निर्णयात आणि यशाच्या या प्रवासात कदम कुटुंबासह त्यांच्या पत्नी विनया कदम यांनी देखील मोलाची साथ दिली असल्याचे उदगार सुनील कदम यांनी काढले. त्या देखील पुणे महानगरपालिकेत सहायक विधी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

> **स्वतावर विश्वास असला की यश हमखास मिळते - सुनील कदम**
>
> यूपीएससी परीक्षेत पहिल्यांदा पात्र झालो. पण त्या नोकरीत मन रमत नव्हते. मी यापेक्षा आणखी काही करू शकतो याचा मनात ध्यास होता. पहिल्या नोकरीचा राजीनामा दिल्याने बोलणी खावी लागली पण आपण उच्चतम काही मिळवू शकतो याची मनात जिद्द होती. बीएसएफ नंतर आज आयआरएस पर्यंत पोहचू शकलो याचे नक्की समाधान आहे. ग्रामीण भागात खूप हुशार, होतकरू तरुणाई असून ध्यास, ध्येय आणि त्यासाठी कठोर मेहनत घेतल्यास यश नक्की मिळते.

# काष्टी येथे जागतिक महिला दिनानिमित्त भव्य सन्मान सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : काष्टी येथील साई मेडिकलच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी विशेष व्याख्यान व सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करून महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिक्रमा शिक्षण संकुलाच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभाताई पाचपुते होत्या. प्रसिद्ध त्वचारोग तज्ञ डॉ. आशुतोष गारूडकर यांनी 'त्वचा व कॉस्मेटिक' या विषयावर मार्गदर्शन करत त्वचेची निगा कशी राखावी आणि सौंदर्य प्रसाधनांचा वापर करताना कोणती काळजी घ्यावी याबाबत उपयुक्त माहिती दिली.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बाबासाहेब भोस, माजी सभापती लताताई पाचपुते, सुनंदाताई पाचपुते, पद्माताई पाचपुते, वैशाली कुतवळ, सविताताई पाचपुते, स्वाती जाधव, कोमल मुनोत, डॉ. वैशाली कोकाटे, डॉ. विद्या दातीर, डॉ. सुचेता काकडे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात सामाजिक कार्यात पुढाकार घेणाऱ्या परिसरातील अनेक महिलांचा साई मेडिकलचे संचालक निवृत्ती शेलार, प्रसाद शेलार व मनिषा शेलार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

तसेच बेलवंडी विद्यालयातील विद्यार्थिनी स्वरा खामकर हिचाही विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी मैत्रिण ग्रुप, मेडिकल असोसिएशन व मधुछाया हॉस्पिटल यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन सोनटक्के यांनी केले, तर आभार मारुती शेलार यांनी मानले.

# यूपीएससीत यश; अल्पेश ढवळे यांचा निघोजमध्ये जल्लोषात सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**निघोज** : यूपीएससी परीक्षेत ६८७ वा क्रमांक मिळवत यश संपादन करणाऱ्या निघोज येथील अल्पेश अरुणा भाऊसाहेब ढवळे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सोमवारी (दि.९) जल्लोषात सत्कार करण्यात आला. डिजेचा दणदणाट, गुलालाची उधळण आणि फटाक्यांच्या आतषबाजीत ग्रामस्थांनी हा शिक्षणाचा आनंदोत्सव साजरा केला. अल्पेश ढवळे हे यूपीएससी परीक्षेत यश मिळवणारे निघोज गावातील पहिले विद्यार्थी ठरले असून त्यांच्या यशामुळे गावाच्या नावाला देशपातळीवर नवा मान मिळाला आहे. एसटी बसस्थानकापासून मळगंगा मातेचे दर्शन घेऊन ग्रामपंचायत चौक मार्गे कपिलेश्वर मंगल कार्यालयापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणुकीत कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कपिलेश्वर मंगल कार्यालयात झालेल्या सत्कार सोहळ्यात ग्रामपंचायत, विविध संस्था तसेच मुंबईकर मंडळाच्या वतीने अल्पेश ढवळे, त्यांच्या आई अरुणाताई ढवळे आणि कुटुंबीयांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षकांनी अल्पेश यांचा शैक्षणिक प्रवास उलगडताना जिल्हा परिषद शाळा व मळगंगा देवी माध्यमिक विद्यालयातील त्यांची अभ्यासू वृत्ती, स्मरणशक्ती आणि नम्र स्वभाव यांची माहिती देत त्यांना शुभेच्छा दिल्या.

सत्काराला उत्तर देताना अल्पेश ढवळे म्हणाले की, जिल्हा परिषद शाळेतून मिळालेला शिक्षणाचा पाया, कुटुंबीय आणि गावकऱ्यांचे पाठबळ यामुळे हे यश मिळाले. भविष्यात सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

# मातृत्व, नेतृत्व व कर्तृत्वाचा संगम म्हणजे स्त्री : सुरेखा झाडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव** : मातृत्व, नेतृत्व आणि कर्तृत्व यांचा संगम म्हणजे स्त्री होय म्हणून संस्कारक्षम समाज घडवण्यासाठी स्त्रियांचे योगदान महत्वाचे आहे असे प्रतिपादन शिक्षिका सुरेखा झाडे यांनी बोलताना सांगितले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ढोरजळगावने येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



त्यावेळी सौ झाडे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी सरपंच सौ. अश्विनी कराड होत्या यावेळी माजी सरपंच, सौ गौरी अनंता उकिर्डे यांच्यासह सर्व माता पालक कार्यक्रमास उपस्थित होत्या. शाळेच्या वतीने सर्व महिलांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शाळेच्या विद्यार्थीनीनी राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, किरण बेदी,कल्पना चावला यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले.

शिक्षिका मंगल बडे यांनी बोलताना सांगितले की मुलगा आणि मुलगी यामध्ये भेदभाव न करता मुलींनाही शिक्षणाची चांगली संधी उपलब्ध करून दिली पाहिजे म्हणजे मुली सर्वच क्षेत्रात आपले योगदान देऊन स्वतः ला सिद्ध करतील. यावेळी महिलांचे फनी गेम्स घेण्यात आले. विजेत्या महिलाना शालेय साहित्य बक्षीस म्हणून देण्यात आले.या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ.चौथीच्या विद्यार्थिनींनी केले.

# हिंदू संमेलनाला बहुजन संघटनांचा तीव्र विरोध

## हिंदू संमेलनाच्या नावाखाली विष पेरू नका बहुजन संघटनांचा विद्रोही इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : येथे आयोजित करण्यात येत असलेल्या हिंदू संमेलन कार्यक्रमाविरोधात बहुजन संघटनांनी विद्रोही भूमिका घेतली आहे. संभाजी ब्रिगेड, आरपीआय , वंचित बहुजन आघाडी सत्यशोधक समाज तसेच विविध बहुजन संघटनांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत प्रशासनाला कठोर इशारा दिला आहे. यासंदर्भात श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे निवेदन देण्यात आले. पत्रकार परिषदेत संघटनांच्या प्रतिनिधींनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, हिंदू संमेलन या नावाखाली काही मंडळी समाजात विष पेरण्याचे काम करत आहेत. हिंदूंच्या नावाने एकतेच्या घोषणा द्यायच्या आणि प्रत्यक्षात समाजात जाती-जातींमध्ये भिंती उभ्या करायच्या हा दुटप्पीपणा आता सहन केला जाणार नाही.

संघटनांनी काही व्यक्तींवर टीका करत म्हटले की, मुंह में राम और बगल में छुरी अशी त्यांची भूमिका आहे. एका बाजूला हिंदू एकतेचे ढोल वाजवले जातात, तर दुसऱ्या बाजूला संतांच्या स्मृतींचा अपमान केला जातो. विशेषतः संत रोहिदास महाराज यांच्या समाधीवर स्वच्छतागृह बांधण्यासारखे कृत्य करून समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असल्याचा आरोप करण्यात आला.संघटनांनी म्हटले की, हिंदू धर्माच्या नावाने राजकारण करून समाजात विषमता पसरवणाऱ्यांचा खरा चेहरा श्रीगोंदा करांना दाखवून दिला जाईल. श्रीगोंदा ही संत परंपरेची आणि सामाजिक ऐक्याची भूमी आहे. येथे संत शेख मोहम्मद महाराज यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश दिला. त्यामुळे या भूमीवर धर्माच्या नावाने समाजात तेढ निर्माण करण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असेही संघटनांनी स्पष्ट केले.पत्रकार परिषदेत असेही सांगण्यात आले की, हभप रामगिरी महाराज काही प्रक्षोभक वक्तव्यांमुळे राज्यातील विविध ठिकाणी सुमारे १७ पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे अशा व्यक्तींना श्रीगोंद्यातील कार्यक्रमात बोलावल्यास कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरू असल्याने हा काळ संवेदनशील आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती हाताळावी, अशी मागणी करण्यात आली. बहुजन संघटनांनी प्रशासनाकडे पुढील मागण्या केल्या हिंदू संमेलन कार्यक्रमावर आवश्यक असल्यास तात्काळ प्रतिबंध घालावा. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करावी ही प्रथम मागणी कार्यक्रमातील मुख्य वक्त्यांकडून कुठल्याही प्रकारचे प्रक्षोभक व समाजामध्ये तेढ निर्माण करणारे वक्तव्य होऊ नये याबाबत लेखी हमीपत्र घ्यावेद्वेषपूर्ण भाषण केल्यास भारतीय न्याय संहिता (इछड) अंतर्गत गुन्हा दाखल करावा. कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधक कारवाई करावी. श्रीगोंदा ही संतांची भूमी आहे, इथे द्वेषाची शेती होऊ देणार नाही. जर प्रशासनाने वेळेत कारवाई केली नाही, तर बहुजन समाज लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करेल, असा इशाराही पत्रकार परिषदेत देण्यात आला.

जिल्हाध्यक्ष आर पी आय निलेश गायकवाड, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष अरविंद जी कापसे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष नानासाहेब शिंदे जिल्हा कार्याध्यक्ष सुनील जी ढवळे, जिल्हा संघटक मुकुंद सोनटक्के जिल्हा संघटक गणेश पारे वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव प्रसाद जी भिवसने वंचित चे तालुका अध्यक्ष संतोषजी जवंजाळ गणेश जी सांगळे दादासाहेब उदमले सुभाष बोराडे आजीज भाई शेख संजय सावंत बामसेफ सुरेश रणवरे अमोल डाळिंबे, यावेळेस हे पदाधिकारी उपस्थित होते.

> श्रीगोंद्यात होऊ घातलेला भव्य हिंदू संमेलन सोहळा या सोहळ्यासाठी प्रमुख मार्गदर्शक विवादित ठरलेले हभप रामगिरी महाराज यांनी श्रीगोंदा या ठिकाणी या मेळाव्यात समाजात तेढ निर्माण होईल असे वक्तव्य केल्यास किंवा चितावणी खोर वक्तव्य केल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (-) हे त्या महाराजांच्या तोंडाला काळे तर फासेलच व चपलांचा हार देखील घालेल
> **निलेश गायकवाड, आरपीआय (-) जिल्हाध्यक्ष, अहिल्यानगर दक्षिण**
>
> राष्ट्रगीत मान्य नसणाऱ्या हभप रामगिरी महाराजावर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करावा तसेच संत शेख महंमद महाराजांच्या भूमीमद्धे सामाजिक तेढ निर्माण करणारी वक्तव्य केल्यास संभाजी ब्रिगेड रामगिरी महाराजाचे तोंड काळे करणार.
> **शिवश्री अरविंद रेखा विठ्ठलराव कापसे, जिल्हाध्यक्ष-संभाजी ब्रिगेड, अहिल्यानगर.**

# नगररचना विभागाच्या परीक्षेत मोहिनी रासकर राज्यात चौथी; मुलींमध्ये प्रथम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर** : राज्य सरकारच्या नगररचना विभागाने घेतलेल्या लघुलेखक (वर्ग २) परीक्षेत पारनेर तालुक्यातील वाघुंडे बुद्रूक येथील मोहिनी संतोष रासकर राज्यात चौथ्या क्रमांकाने तर मुलींमध्ये पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. शेतकरी कुटुंबातील मोहिनी रासकरने वयाच्या २१ व्या वर्षी मोठ्या कष्टाने व जिद्दीने यश मिळवले.

जागतिक महिला दिनानिमित्त वाघुंडे बु. येथे मोहिनी रासकर हिचा राजेश्वरी दत्तात्रय दिवटे- कोठावळे यांच्या हस्ते सत्कार व सन्मान करण्यात आला यावेळी उपस्थित चंद्रकला रासकर, साधना दिवटे, कल्पना पठारे, कल्पना गाडीलकर, शोभा गाडीलकर, पुष्पा गाडीलकर, साक्षी गडीलकर आदी उपस्थित होते. माझ्या कुटुंबाने दिलेली प्रेरणा व साथ यामुळे मी हे यश मिळवले, असे मोहिनी रासकरने यावेळी सांगितले. कमी वयात मिळवलेल्या या यशाबद्दल मोहिनी रासकरचे कौतुक होत आहे.



जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वाघुंडे बुद्रूक येथे मोहिनी रासकर हिचा विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी राजेश्वरी दत्तात्रय दिवटे-कोठावळे यांच्या हस्ते मोहिनीचा गौरव करण्यात आला. ग्रामीण भागातील मुलींनी शिक्षणासोबतच प्रशासकीय सेवेत येण्याचे स्वप्न पहावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. सत्काराला उत्तर देताना मोहिनी रासकर भावूक झाली होती. ती म्हणाली, माझ्या यशाचे संपूर्ण श्रेय माझ्या कुटुंबाला जाते. त्यांच्या प्रेरणेमुळे आणि खंबीर साथीमुळेच मी इथपर्यंत पोहोचू शकले.

स्पर्धा परीक्षेत सातत्य ठेवले तर यश नक्की मिळते. मोहिनीच्या या यशामुळे वाघुंडे बुद्रूक गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

> मोहिनीचे हे यश केवळ रासकर कुटुंबाचाच फक्त अभिमान नसून, वाघुंडे बुद्रुक गावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे ग्रामीण भागातील प्रत्येक मुलीसाठी एक मोठी प्रेरणा आहे. शेतकरी कुटुंबातील पार्श्वभूमी असतानाही, वयाच्या २१ व्या वर्षी जिद्दीच्या जोरावर तिने राज्यात मुलींमध्ये प्रथम क्रमांक पटकावला, हे तिच्या कष्टाचे फळ आहे. मनात जिद्द असेल तर गगनभरारी घेता येते, हेच मोहिनीने सिद्ध केले आहे.
> **राजेश्वरी दत्तात्रय दिवटे-कोठवळे**

द • ख • ल

## वारकरी शिक्षण संस्थांतील बालसुरक्षेसाठी प्रशासन सतर्क

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** वारकरी संप्रदायाच्या आध्यात्मिक शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात विशेष प्रशासकीय समितीची बैठक मंगळवारी आळंदी नगरपरिषद कार्यालयात पार पडली. बालकांवरील लैंगिक शोषण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीचे अध्यक्षस्थान खेडचे उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांनी भूषविले. समितीचे सचिव तथा आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी




माधव खांडेकर, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. वारकरी शिक्षण संस्थांमध्ये वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा आढावा घेऊन अत्याचार किंवा लैंगिक शोषण होऊ नये यासाठी प्रशासनाने कोणत्या ठोस उपाययोजना कराव्यात यावर चर्चा झाली. बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (झजउडज) प्रभावीपणे लागू करण्यावर भर देण्यात आला. संस्थांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, विद्यार्थ्यांसाठी तक्रार पेटी उपलब्ध करणे, नियमित समुपदेशनाची व्यवस्था करणे आणि इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या संदर्भात प्रशासनाकडून लवकरच मानक कार्यपद्धती (डजझ) तयार करण्यात येणार असून सर्व संस्थांनी त्याचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

बैठकीस जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रोहिणी ढवळे, आळंदी पोलीस निरीक्षक भिमा नरके, दिघी पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ, ससून रुग्णालयाचे मानसोपचार तज्ज्ञ सचिन महाजन, आरोग्य अधिकारी आर. बी. ढाकणे, मुख्याध्यापक संतोष मरभळ, पोलीस उपनिरीक्षक डी. एस. जाधव, एम. एन. शेंडे, अर्जुन घोडे आणि आळंदी नगरपरिषदेचे समुदाय संघटक उपस्थित होते.

## महापौर चषक स्पर्धेत शिवकालीन युद्धकला समाविष्ट करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुणे महानगरपालिकेतर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या महापौर चषक क्रीडा स्पर्धांमध्ये शिवकालीन युद्धकलेचा समावेश करावा, अशी मागणी नगरसेविका रुपाली धाडवे व माजी नगरसेवक दिनेश धाडवे यांनी महापौर मंजुषा नागपुरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.महाराष्ट्राच्या शौर्यपरंपरेचे प्रतीक असलेल्या मर्दानी खेळ, तलवारबाजी, दांडपट्टा, लाठी-काठी आणि भाला



यांसारख्या पारंपरिक युद्धकला नव्या पिढीपर्यंत पोहोचाव्यात आणि त्यांना योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने ही मागणी करण्यात आली आहे. महापौर चषक क्रीडा स्पर्धा शहरातील युवकांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देणारे महत्त्वाचे व्यासपीठ ठरत आहेत. या स्पर्धांमध्ये शिवकालीन युद्धकलेचा समावेश झाल्यास युवकांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, आत्मविश्वास आणि देशभक्तीची भावना अधिक दृढ होण्यास मदत होईल, असे रुपाली धाडवे यांनी नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाशी जोडलेली मर्दानी खेळांची परंपरा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचा महत्त्वाचा भाग आहे. या कलेला प्रोत्साहन मिळाल्यास तरुण पिढीला आपल्या इतिहासाशी जोडण्याची संधी मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. महापौर मंजुषा नागपुरे यांनी मागणीचे स्वागत करत विषय सकारात्मक असून त्यावर योग्य तो विचार केला जाईल, असे आश्वासन दिले. त्यामुळे भविष्यात महापौर चषक स्पर्धांना पारंपरिक क्रीडा व सांस्कृतिक वारशाची जोड मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य सदैव प्रेरणादायी : मंजुश्री मुरकुटे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** नॉर्दन ब्रँच परिसरातील युवा जागृती प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आरती करण्यात आली.या कार्यक्रमास श्रीरामपूर नगरपालिकेच्या नगरसेविका व महिला-बालकल्याण विभागाच्या सभापती मंजुश्री सिद्धार्थ मुरकुटे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच नगरपालिका पाणीपुरवठा विभागाचे सभापती योगेश जाधव, कारेगाव भाग शुगरचे संचालक प्रतीक वाकचौरे, उत्तमराव मालकर, रमण मालकर, कलावती मरसाळे, योगिता मरसाळे, साक्षी मरसाळे, सामाजिक कार्यकर्ते लहानू त्रिभुवन, लक्ष्मणराव निकम, गणेश मगर, विजय बागुल, भाऊसाहेब देशमुख, संतोष मोरगे व विजय बनसोड यांची उपस्थिती होती. यावेळी मनोगत व्यक्त करताना मंजुश्री मुरकुटे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य सदैव प्रेरणादायी आहे. प्रजेच्या कल्याणासाठी, महिलांच्या सन्मान व संरक्षणासाठी त्यांनी केलेले कार्य आजही मार्गदर्शक आहे. विश्वासू मावळे, सक्षम संघटन कौशल्य, युद्धनीती, पाणी व्यवस्थापन तसेच गडकोटांचे व्यवस्थापन या सर्व बाबींमध्ये त्यांनी आदर्श निर्माण केला. समाजातील प्रत्येकाने महिलांचा सन्मान राखत त्यांच्या विचारांवर चालावे, असे आवाहन त्यांनी केले.

# शिरूर पंचायत समितीच्या सभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्वाती घावटे

### उपसभापतीपदी रामभाऊ सासवडे यांची बिनविरोध निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शिरूर पंचायत समितीच्या सभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्वाती घावटे यांची तर उपसभापतीपदी रामभाऊ सासवडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीत विरोधी उमेदवारांनी माघार घेतल्याने ही निवड बिनविरोध झाली.



मागील महिन्यात झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने आघाडी घेत ८ जागांवर विजय मिळवला होता. तर भारतीय जनता पक्षाला ५ जागा मिळाल्या असून एक अपक्ष सदस्य निवडून आला आहे. पंचायत समितीच्या एकूण १४ जागा आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकत्रितपणे लढवल्या होत्या.

यंदा पंचायत समितीच्या सभापतीपदासाठी ओबीसी महिला प्रवर्गाचे आरक्षण होते. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसकडून स्वाती घावटे यांनी सभापतीपदासाठी तर रामभाऊ सासवडे यांनी उपसभापतीपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

दरम्यान भारतीय जनता पक्षाकडून सभापतीपदासाठी मनीषा सतीश पाचंगे तर उपसभापतीपदासाठी सागर देवकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र, अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीत पाचंगे आणि देवकर यांनी माघार घेतल्याने स्वाती घावटे व रामभाऊ सासवडे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली.पंचायत समिती सभापतीपदी स्वाती घावटे तर उपसभापतीपदी रामभाऊ सासवडे यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल जोशी यांनी घोषित केले. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून महेश डोके यांनी काम पाहिले.

या निवडीमुळे शिरूर पंचायत समितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व कायम राहिले आहे.स्वाती घावटे या शिरूर ग्रामीण पंचायत समिती गणातून निवडून आल्या आहेत तर रामभाऊ सासवडे हे शिक्रापूर पंचायत समिती गणातून निवडून आले आहेत.

# सासवड शहर पत्रकार संघाच्या वतीने कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**नितीन यादव । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** सध्या अनेक ठिकाणी अत्याचाराच्या घटना ऐकण्यात येतात त्याला पुरुषांप्रमाणे स्त्रियाही काही अंशी जबाबदार आहेत, कुटुंबात महिलेने समजून घेतले तर वाद होणार नाहीत असे आवाहन पुरंदरच्या गटविकास अधिकारी प्रणोती श्री श्रीमाळ यांनी केले आहे. सासवड पोलिस स्टेशन येथे पोलिस व शहर पत्रकार संघाच्या वतीने आयोजित जागतिक महिला दिन निमित्ताने आयोजित महिला सन्मान सोहळा कार्यक्रमात त्या बोलत होत्या. पोलिस निरीक्षक कुमार कदम, पोलिस उपनिरीक्षक अर्चना पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.सोबतच्या महिलेला आपण त्या जागी स्वतः आहोत अशी वागणूक द्या किमान तशी अपेक्षा ठेवा असेही श्री श्रीमाळ यांनी स्पष्ट केले .सासवड पोलिस स्टेशन व पत्रकार संघ सासवड शहर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही




महिला दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील पाच कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. सासवड एस टी स्टँड परिसरात स्वच्छतेचे काम करणाऱ्या छाया सुभाष पवार, शेतकरी असूनही दोन्ही मुलांना पोलिस खात्यात दाखल करणाऱ्या उदाचीवाडी येथील वैशाली तानाजी हगवणे, संगीत क्षेत्रात विशेष काम करणाऱ्या सुवर्णा भगवान होले (नाळे) , अगदी कमी कालावधीत वैधव्य प्राप्त झाले असूनही चार मुलांना उच्च विभूषित करणाऱ्या परवीन मुसाभाई बागवान व सासवड पोलिस स्टेशन येथे वाहन चालक म्हणून कार्यरत असलेल्या रुपाली गंगाधर पुंडगे (वाढवे)यांना या प्रसंगी सन्मानपत्र आणि साडीचोळी देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.सुवर्णा होले, छाया पवार तसेच परवीन बागवान यांच्या वतीने त्यांची नात आयात बागवान यांनी सत्काराला. मनोगतातून उत्तरे दिली. पोलिस निरीक्षक कुमार कदम यांनी या उपक्रमाचे कौतुक करत पुरस्कारार्थींची संख्या अजून वाढवावी अशी अपेक्षा व्यक्त केली. सर्व पुरस्कार प्राप्त महिलांचे कौतुक करत त्यांना कदम यांनी प्रोत्साहित केले. किशोरी अतुल पवार यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. पत्रकार संघाचे अध्यक्ष हेमंत ताकवले यांनी सूत्र संचालन केले.बाळासाहेब कुलकर्णी यांनी प्रास्तविक केले तर संभाजी महामुनी यांनी आभार मानले.ज्येष्ठ समाजवादी नेते रावसाहेब पवार, प्राचार्य इस्माईल सय्यद, संतोष जगताप, नगरसेवक माऊली गिरमे, डॉ संदीप होले, मोहन चव्हाण, अविनाश निगडे, हनुमंत मेमाणे, प्रा संदीप टिळेकर, केशव काकडे, हरून बागवान, भालचंद्र बुधकर ,ॲड भगवान होले, अशपाक बागवान, कलाताई फडतरे ,कुमुदिनी पांढरे यांसह अनेक मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. सुधीर गुरव, गणेश मुळीक, जीवन कड राजेंद्र बर्गे, नितीन यादव ,गौरव कोलते, तानाजी सातव, संदीप जगताप, जगदीश शिंदे या पत्रकार मंडळीबरोबरच पोलिस स्टेशनचे रुपेश भगत आदींनी या सोहळ्याचे सुंदर नियोजन केले

## बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलची शहर कार्यकारिणी जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) सेवादलची शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून अँड. धीरज माणिक लालबीगे यांची शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शहर कार्यालयात आयोजित बैठकीत ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार, राज्यसभा खासदार पार्थ पवार तसेच युवा नेते जय पवार यांच्या सूचनेनुसार बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अँड किरण इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलच्या संघटनात्मक बांधणीसाठी नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.यावेळी शहराध्यक्ष अँड. धीरज लालबीगे यांनी सेवादलच्या शहर कार्यकारिणीची घोषणा केली. पक्षाची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच सामाजिक व जनहिताच्या उपक्रमांमध्ये सेवादलने सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.या बैठकीस शहराध्यक्ष अँड. किरण इंगळे, उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, उपगटनेते संपदा चौधर,नगरसेवक सोमनाथ गजाकस, गणेश जोजारे, विशाल हिंगणे, गोरख पारसे, सेवादलचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील काळे, सेवादल जिल्हाध्यक्ष सचिन गुप्ता, जिल्हा महिला कार्याध्यक्ष ज्योती गाडे, बारामती शहर सेवादलच्या महिला अध्यक्षा अनिता जाधव तसेच राष्ट्रवादी शहर कार्यालयातील जनसंपर्क अधिकारी (पीआरओ) सूरज देवकाते आदी मान्यवर उपस्थित होते.अशी आहे शहर सेवादल कार्यकारिणी :शहराध्यक्ष – अँड. धीरज माणिक लालबीगे, उपाध्यक्ष – शरद धूमाळ, मोहन रणदिवे, शहर संघटक – सचिन भोसले, अँड. रोहन कांबळे, गरीब नवाज शेख, वैभव व्हटकर,कार्यकारिणी सदस्य : सचिन थोरात, शिवकांत गाडे, अँड. धीरज गावडे, अँड ओमकार क्षीरसागर, हुसेन शेख, शिवाजी भिसे, ओम पाटोळे, अमोल गांधी, संतोष सावंत. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून बारामती शहरात राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलचे संघटन अधिक बळकट करून विविध सामाजिक उपक्रम राबवले जातील, असा विश्वास यावेळी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## संभाजीनगर महापालिकेच्या विरोधी पक्षनेते व नगरसेवकांवरील गुन्हे मागे घेण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते व काही नगरसेवकांविरोधात दाखल करण्यात आलेले फौजदारी गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी एमआयएम पक्षाच्या वतीने तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती संभाजीनगर येथे शहागंज ते सिटी चौक परिसरात महानगरपालिकेच्या वतीने हातगाडी चालकांवरील अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आली. ही कारवाई मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरू असताना करण्यात आल्याने अनेक छोट्या व गरीब



हातगाडी व्यावसायिकांवर अन्याय झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. हातगाडीवर लहान व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या गरीब व्यापाऱ्यांवर कारवाई करून त्यांना उपजीविकेपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. काही मोठ्या व्यावसायिकांच्या दबावाखाली तसेच राजकीय सूडबुद्धीने ही कारवाई करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. दरम्यान, या कारवाईला तात्पुरती स्थगिती देण्याची विनंती महानगरपालिकेच्या विरोधी पक्षनेते व काही नगरसेवकांनी संबंधित अधिकाऱ्यांना केली होती. मात्र त्यांच्याविरोधात खोटे गुन्हे दाखल करण्यात आल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. या गुन्ह्यांची तात्काळ मागे घेण्यात यावी, अशी मागणी एमआयएमच्या कार्यकर्त्यांनी केली आहे. निवेदनावर फैसल बासोलान, इमरान खान, अमजद पठाण, अवद बागानून, फैसल सय्यद, अतीक कुरेशी, ताहेर बागानून, सलमान शेख, नदीम खान, अदनान, जमीर शेख, समीर शेख व कैफ कुरेशी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बालआनंद मेळाव्यात १.१० लाखांची उलाढाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगवे (पारगाव) :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित 'बाल आनंद मेळाव्या'ला ग्रामस्थ व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी उभारलेल्या ७२ स्टॉल्समधून तब्बल १ लाख १० हजार रुपयांची विक्रमी खरेदी-विक्री झाली, अशी माहिती मुख्याध्यापक नवनाथ सिनलकर यांनी दिली. पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांना व्यावहारिक कौशल्य, व्यवहारज्ञान आणि आत्मविश्वास मिळावा या उद्देशाने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी स्वतः दुकाने उभारून मेथी, कोथिंबीर, शेवगा, वांगी, पालक यांसारख्या पालेभाज्या तसेच ओली भेळ, वडापाव, सँडविच, पावभाजी, इडली, मंचूरियन, गुलाबजाम आणि



पाणीपुरी यांसारख्या खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते. ग्राहकांना आकर्षित करणे, मालाचा हिशोब ठेवणे आणि चिल्लर पैशांचे नियोजन करणे यातही विद्यार्थ्यांनी कौशल्य दाखवले. गटशिक्षणाधिकारी रुपाली धोका, शिक्षण विभाग पंचायत समिती आंबेगाव यांच्या प्रेरणेतून आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडल्याची माहिती जालिंदर पोंदे यांनी दिली. या मेळाव्याला पंचायत समिती सदस्या श्वेता ढोबळे, पंचायत समिती सदस्या अंकीता वाळुंज, भिमाशंकर सहकारी साखर कारखाना संचालक नितिन वाव्हळ, पोलीस पाटील गणेश पंडित, केंद्रप्रमुख राजू जाधव, संचालक हनुमंत तागड, पीडीसी दत्तात्रय गाढवे, चेअरमन दत्ता गोरडे, उपसरपंच हिरामण गोरडे, संतोष वाव्हळ, सुनंदा ढोबळे, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष समीर गोरडे, उपाध्यक्षा रेखा पाबळे, सदस्य वैजनाथ येंथे, महेश बांगर, गोरक्ष जगताप, योगेश कासार यांच्यासह ग्रामस्थांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे नियोजन जालिंदर पोंदे, श्रीकृष्ण डुकरे, विलास भोर, अशोक लोखंडे, सुभाष इंदोरे, वैजयंती लोखंडे, संगीता इंदोरे, चित्रा पंडित आणि वर्षा लोंढे यांनी केले.

## मुक्तादेवी यात्रेनिमित्त मुखवट्याचे नूतनीकरण महिलांकडून उत्स्फूर्त देणगी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वळती :** आंबेगाव तालुक्यातील वळती गावातील ग्रामदैवत मुक्तादेवी यात्रेनिमित्त ग्रामस्थांनी मुक्तादेवीच्या मुखवट्याचे नूतनीकरण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. गावाच्या धार्मिक परंपरेचे जतन करत यात्रेला अधिक वैभव प्राप्त व्हावे, या उद्देशाने ग्रामस्थांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. मुखवट्याच्या नूतनीकरणासाठी अंदाजे तीन लाख रुपयांहून अधिक खर्च अपेक्षित आहे. यासाठी गावातील महिला भक्तांना देणगी देण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वेच्छेने प्रत्येकी ११०० रुपये देणगी दिली. महिलांच्या या सहभागातून ग्रामदैवताबद्दलची श्रद्धा आणि गावातील एकोप्याची भावना प्रकर्षाने दिसून आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुक्तादेवी यात्रेचे आयोजन उत्साहात करण्यात येणार असून दि. १६ ते १८ मार्च दरम्यान यात्रेचा कार्यक्रम होणार आहे. यात्रेनिमित्त तयार करण्यात आलेल्या नवीन मुखवट्याची गावातून भव्य सवाद्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत गावातील महिला मोठ्या संख्येने सहभागी होणार असून पारंपरिक वेशभूषेत टाळ-मृदंगाच्या गजरात मिरवणूक काढली जाणार आहे. मुक्तादेवी ही वळती गावाची ग्रामदैवता असल्याने या यात्रेला गावात विशेष धार्मिक महत्त्व आहे. यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम, पूजा-अर्चा आणि भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळणार आहे. महिला भक्त व ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यंदाची मुक्तादेवी यात्रा अधिक उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी होणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.



# ४१६ कोटींच्या सिमेंट रस्त्यावर डांबराचे कार्पेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील अवसरी फाटा ते शिरूर तालुक्यातील जांबुतमार्गे शिक्रापूर रस्त्याच्या कामासाठी महाराष्ट्र शासनाकडून ४१६ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. या मार्गावर रस्त्यावर सिमेंट कॉक्रीटचे काम सुरू आहे . मात्र निरगुडसर पारगाव दरम्यान निरगुडसर हद्दीतील बेटवस्ती येथे चांगल्या अवस्थेत असणारा रस्ता जेसीबी यंत्राच्या साह्याने उघडून पुन्हा त्याच रस्त्यावर डांबराचे कार्पेट करण्याचे काम सुरू आहे या कामासंदर्भात आंबेगाव सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता कुंभार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी हा रस्ता रस्ते विकास महामंडळाकडे वर्ग केलेला असल्याचे सांगितले.

या रस्त्यावर रस्ते विकास महामंडळाचे नियंत्रण असल्याचे कुंभार यांनी सांगितले. सदर रस्त्याबाबत रस्ते विकास महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधला असता संबंधित अधिकाऱ्यांनी फोन उचलला नाही. सदर रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा होणार असताना निरगुडसर हद्दीत बेटवस्ती येथे चांगल्या स्थितीत असणारा डांबरी रस्ता संबंधित ठेकेदाराने उखडून पुन्हा त्याच रस्त्यावर डांबराचे कारपेट केल्याने नागरिकांमध्ये या रस्त्याच्या कामाबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

**अवसरी फाटा ते शिरूर तालुक्यातील जांबुत मार्गे शिक्रापूर रस्त्याच्या कामासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करुन सिमेंट कॉंक्रीट रस्ता बनवण्याचे काम सुरु आहे .तर निरगुडसर हद्दीत डांबरी कार्पेट केले आहे संबंधित ठेकेदार अधिकारी यांच्याशी सदर कामासंदर्भात संपर्क साधला असता ठेकेदार अधिकारी फोन उचलत नाही. संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांच्या विरोधात योग्य त्या न्यायालयात दाद मागणार आहे.**

**विशाल जालींदर वाबळे**
**( राष्ट्रवादी युवक अध्यक्ष श.प. पक्ष आंबेगाव )**



रस्ते विकास महामंडळाकडून आपल्या मर्जीतील ठेकेदारांना करोडोंची कामे दिली असल्याने ठेकेदाराला मालामाल करण्यासाठी अधिकारी वर्ग जाणीवपूर्वक या कामाकडे दुर्लक्ष करीत आहे असा आरोप स्थानिक नागरिक करत आहे.

## भागवत कथा म्हणजे भक्ती, ज्ञान आणि वैराग्याचा संगम : भागवताचार्य सिद्राम महाराज काळे

### आळंदीत संगीत श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** श्रीमद्भागवत कथा ही केवळ धार्मिक वाचन नसून ती भक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांचा सुंदर संगम आहे. भागवत ऐकणाऱ्या प्रत्येकाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची ताकद या कथेच्या माध्यमातून मिळते, असे प्रतिपादन भागवताचार्य ह.भ.प.सिद्राम महाराज काळे यांनी केले.

आळंदी नगरीत गं.भा. विमल (काकू) गोपाळ पाटील कुऱ्हाडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या संगीत श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात ते बोलत होते. त्यांच्या सुश्राव्य आणि रसाळ वाणीतून श्रीमद्भागवत कथेचे निरूपण होत असून कथेचा लाभ घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.




कथेच्या माध्यमातून भागवत धर्माचे महत्त्व, भक्तीमार्गाची साधना तसेच जीवनातील सदाचार आणि आध्यात्मिक मूल्ये यांचे सोप्या शब्दांत विवेचन करण्यात येत आहे. सिद्राम महाराज काळे यांच्या प्रभावी कथनशैलीमुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध होत असून वातावरण भक्तीरसाने भारावून गेले आहे.

संगीत श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ या सोहळ्याचे आयोजन ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे विश्वस्त योगेंद्र कुऱ्हाडे व परिवाराच्या वतीने करण्यात आले असून वारकरी, भाविक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून कथेचा लाभ घेत आहेत. आयोजकांनी अधिकाधिक भाविकांनी उपस्थित राहून कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री.भैरवनाथ महाराज उत्सव मंडळाचे अध्यक्ष शंकरराव कुऱ्हाडे यांनी केले आहे.

## द•ख•ल

### संगमेश्वर विद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर

**लिंपणगाव :** जागतिक महिला दिनानिमित्त संगमेश्वर विद्यालय व संगमेश्वर इंग्लिश स्कूल, सांगवी फाटा येथे महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित केलेले हे शिबिर उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाचे उद्घाटन सखी सावित्री समितीच्या अध्यक्षा तथा संस्थेच्या सदस्या अर्चना योगेश भोईटे यांच्या हस्ते झाले. त्यांनी महिलांनी स्वतःच्या आरोग्याची नियमित काळजी घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या शिबिरासाठी दौंड येथील पुष्पलक्ष्मी हॉस्पिटलमधील तज्ज्ञ डॉक्टरांनी उपस्थित राहून महिलांची तपासणी केली. यामध्ये डॉ. उदय शेलार (एमडी), डॉ. कपिल देशमुख (चेस्ट फिजिशियन), डॉ. अश्विन देवकर (एमडी मेडिसिन), डॉ. वैष्णवी चव्हाण (स्त्रीरोग तज्ज्ञ) व डॉ. प्रफुल इंगळे (अस्थिरोग तज्ज्ञ) यांनी महिलांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला. परिसरातील अनेक महिलांनी शिबिरात सहभागी होत आरोग्य तपासणी करून घेतली.

या उपक्रमाचे समन्वयक निलेश हराळ यांनी नियोजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिस काकडे व मदने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थापक धनसिंग भोईटे, मुख्याध्यापिका वृषाली फराटे व शिक्षकवृंदांनी उपस्थित डॉक्टर व सहभागी महिलांचे आभार मानले.

### प्रश्न विचारल्याच्या रागातून पती-पत्नीला मारहाण; मनीमंगळसूत्र हिसकावले

**राहुरी :** येथे का थांबले? असे विचारल्याच्या रागातून काही जणांनी पती-पत्नीला शिवीगाळ करत लाकडी दांडा व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून महिलेच्या गळ्यातील मनीमंगळसूत्र हिसकावल्याची घटना राहुरी तालुक्यातील वांजुळपोई शिवारात १ मार्च रोजी सकाळी घडली.

कांचन तुकाराम आघाव (वय ३५, रा. तिळापुर) व त्यांचे पती तुकाराम आघाव हे आपल्या शेतात काम करत असताना शेताच्या रस्त्यावर अनिल गिते व विलास गिते मोटारसायकल उभी करून थांबले होते. याबाबत येथे का थांबले? असा प्रश्न विचारल्याने आरोपी संतापले. त्यांनी शिवीगाळ करत कांचन आघाव व त्यांच्या पतीला लाकडी दांडा व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. दरम्यान, इतर आरोपीही घटनास्थळी येऊन मारहाणीत सहभागी झाले. तसेच कांचन आघाव यांच्या गळ्यातील सुमारे ५ ग्रॅम वजनाचे मनीमंगळसूत्र काढून घेतल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी कांचन आघाव यांच्या फिर्यादीवरून अनिल गिते, विलास गिते यांच्यासह आठ जणांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### मुठेवाडगाव विद्यालयातील विद्यार्थ्यांना टिफिन बॅग व टिफिन बॉक्सचे वाटप

**माळवाडगाव :** बारामती कॅटल फीड्स प्रायव्हेट लिमिटेड, श्रीरामपूर यांच्या सीएसआर योजनेतून तसेच श्रीकृष्ण पशुखाद्य फर्म यांच्या सहकार्याने मुठेवाडगाव येथील बेलापूर एज्युकेशन संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलमधील सर्व विद्यार्थ्यांना मोफत टिफिन बॉक्स व टिफिन बॅगचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमात बारामती कॅटल फीड्सचे मार्केटिंग ऑफिसर धीरज बोरसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, कंपनीच्या सीएसआर उपक्रमांतर्गत तालुक्यातील अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास करून परीक्षेत चांगले गुण मिळवावेत. गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींना प्रोत्साहनपर बक्षिसे देऊन सन्मानित केले जाईल तसेच गरजू विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शन केले जाईल, असेही त्यांनी सांगितले. पत्रकार भाऊसाहेब काळे यांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लहानू मुठे होते. यावेळी मुख्याध्यापक काशिद, सर्व शिक्षकवृंद तसेच परिसरातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभिजीत मुठे यांनी केले तर आभार कंपनीचे सेल्स ऑफिसर गणेश साळुंके यांनी मानले.

### रस्त्यावरून जाण्यावरून दोघा भावांना मारहाण; सोन्याची चैन हिसकावली

**राहुरी :** या रस्त्याने जायचे नाही, असे म्हणत आरोपींनी दोघा भावांना शिवीगाळ करत लोखंडी गज व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावल्याची घटना राहुरी तालुक्यातील वांजुळपोई शिवारात १ मार्च रोजी रात्री घडली.

अनिल सखाराम गिते (वय ४५, रा. तिळापुर) यांची वांजुळपोई शिवारात शेती असून ते व त्यांचे भाऊ विलास गिते हे शेतात पाणी देऊन मोटारसायकलवरून घरी परत येत होते. रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास नारायण आघाव यांच्या घराजवळील रस्त्यावर आरोपींनी त्यांना अडवून या रस्त्याने जाऊ नका असे सांगत वाद घातला. हा रस्ता सार्वजनिक असल्याचे गिते यांनी सांगितल्याने आरोपींनी संतापून दोघा भावांना लोखंडी गज व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच अनिल गिते यांच्या गळ्यातील दीड तोळे वजनाची सोन्याची चैन काढून घेतल्याचा आरोप आहे.

दरम्यान, समजावण्यासाठी गेलेल्या विलास गिते, अशोक भाकरे व पंकज पवार यांनाही आरोपींनी पुन्हा मारहाण केली. या प्रकरणी अनिल गिते यांच्या फिर्यादीवरून नारायण हरीभाऊ आघाव, तुकाराम नारायण आघाव, भारत नारायण आघाव (रा. वांजुळपोई), मोहन विठ्ठल आघाव (रा. तिळापुर) व दोन अनोळखी इसमांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे करीत आहेत.

---

## कोण म्हणतं देत नाही घेतल्याशिवाय राहत नाही!

# घोषणांनी दणाणले तहसील कार्यालय

## काष्ठी साईसेवा पतसंस्थेवर कारवाईची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** तालुक्यातील काष्ठी येथील साईसेवा ग्रामीण /मल्स्टिस्टेट पतसंस्था फसवणूक प्रकरणी ठेवीदारांनी एकत्र येत तहसीलदार, पोलीस निरीक्षक तसेच सहाय्यक निबंधक यांना निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली.त्यावेळी कोण म्हणतं देत नाही घेतल्याशिवाय राहत नाही! अशा जोरदार घोषणांनी श्रीगोंदा तहसील कार्यालय परिसर मंगळवारी दणाणून गेला होता.

काष्टी या ठिकाणी साईसेवा ग्रामीण/ मल्टीस्टेट पतसंस्था यांनी साईंची सेवा करताना चेरमन संचालक यांनीच मेवा खाल्ल्याचा आरोप ठेवीदारांनी केला आहे तेथील पतसंस्थेच्या ठेवीदारांच्या म्हणण्यानुसार, या पतसंस्थेकडे सुमारे ७५ कोटी रुपयांच्या ठेवी देणे आहेत, तर ६२ कोटी रुपयांचे कर्ज वाटप झालेले आहे. संस्थेत ५० हजार ते १ लाख रुपयांपर्यंत ठेवी ठेवणारे सुमारे ११ हजार ठेवीदार असून काही मोठ्या ठेवीदारांची रक्कम कोटींच्या घरात असल्याची माहिती आंदोलकांनी दिली.दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी गंभीर



आरोप करत संस्थेचे संचालक व चेअरमन यांनी विविध ठिकाणी मालमत्ता खरेदी केल्याची माहिती प्रशासनाला दिली. तसेच ठेवी परत मागण्यासाठी गेलेल्या ठेवीदारांशी अरेरावीची भाषा वापरली जात असल्याचा आरोपही करण्यात आला. यासाठी सर्व ठेवीदारांनी एकत्रित येत श्रीगोंदा तहसील कार्यालयात तहसीलदार सचिन डोंगरे तसेच पोलीस ठाणे यासह सहाय्यक निबंधक नारायण पराजने यांना आपले निवेदन देत ठेवीदारांनी विविध मागण्या केल्या आहेत त्यामध्ये साईसेवा पतसंस्थेवर तात्काळ गुन्हा दाखल करावा, संचालक व चेअरमन यांच्या मालमत्तेची चौकशी करावी, ठेवीदारांचे अडकलेले पैसे तातडीने परत मिळवून द्यावेत अश्या विविध मागण्या करण्यात आल्या असून या प्रकरणामुळे श्रीगोंदा तालुक्यातील सहकारी पतसंस्थांच्या कामकाजावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून ठेवीदारांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

यावेळी निवेदन देताना सारंग पाचपुते,आशा ताटे, प्रीतम पाचपुते, गोरख काळे,मच्छिंद्र पाचपुते,प्रकाश पाचपुते, दत्तात्रय मांडे, जुनेद शेख, डॉ.राजेंद्र पाचपुते, शर्मिला निऱ्हाली यांच्यासह मढेवडगाव श्रीगोंदा काष्टी येथील अनेक ठेवीदार उपस्थित होते.

#### ■ तहसीलदार पोलीस निरीक्षक यांच्याकडून सहकार्याचे आश्वासन

साईसेवा पतसंस्था मध्ये ठेवीदारांची फसवणूक प्रकरणात तहसीलदार सचिन डोंगरे यांना तसेच श्रीगोंदा पोलीस ठाण्यात निवेदन दिल्यावर त्यांनी ठेवीदारांना सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल असे आस्वासन दिल्यावर ठेवीदारांना काहीसा दिलासा वाटला असल्याचे अनेक ठेवीदारांनी माध्यमाशी बोलताना सांगितले आहे.

#### ■ अनेक ठेवीदारांना आपत्कालीन गरज

तहसीलदार याना निवेदन दिल्यावर एका ठेवीदाराने बोलताना सांगितले कि माझ्या आयुष्यभराच्या काष्ठाची कमाई मी साईसेवा मध्ये साठवली होती आज माझे वडील आजारी असून मला उपचारसाठी पैश्याची खून तात्काळ गरज आहे मात्र चेरमन संचालक आम्हाला काय करायचे ते करा अशी दमबाजी करत आहेत त्यामुळे मला काय करावे हेच सुचत नाही असेही बोलताना सांगितले आहे.

#### ■ चौकशी प्रक्रिया सुरू

साईसेवा पतसंस्था राज्यस्तरीय असल्यामुळे या प्रकरणी सहाय्यक निबंधक नारायण परजने यांनी दुय्यम निबंधक, तहसीलदार श्रीगोंदा तसेच जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे. संस्थेचे व्यवहार व नोंदी तात्पुरते थांबविण्याची विनंती करण्यात आली आहे.याबाबत लेखापरीक्षण अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येणार असून दोषारोप निश्चित करून १५ एप्रिलपर्यंत सहकार आयुक्त, पुणे यांच्याकडे अहवाल सादर करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

---

## 'विकसित भारत २०४७'मध्ये महाविद्यालये ठरतील राष्ट्र परिवर्तनाचे केंद्रबिंदू



**लिंपणगाव :** श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात 'विकसित भारत २०४७ मध्ये महाविद्यालयांचे योगदान' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद उत्साहात पार पडली. ६ व ७ मार्च २०२६ रोजी आयोजित या परिषदेत देशाच्या भविष्यातील शैक्षणिक वाटचालीवर आणि तरुण शक्तीच्या भूमिकेवर सखोल चर्चा करण्यात आली. परिषदेचे उद्घाटन कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा येथील कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी बोलताना त्यांनी शिक्षणाचा उद्देश केवळ पदवी मिळवणे नसून जबाबदारीची जाणीव आणि मानवी मूल्यांची जपणूक करणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात भारत जागतिक महासत्ता म्हणून उदयास येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांनी भौतिक प्रगतीसोबत माणुसकी टिकवून ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात महाविद्यालये ही 'कौशल्य केंद्रे' असून ती उद्याच्या तरुण पिढीला घडवणारी संस्थाने असल्याचे नमूद केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. संदीप पालवे यांनी महाविद्यालये ही राष्ट्र परिवर्तनाची केंद्रे असल्याचे सांगितले. परिषदेच्या सत्रात प्राचार्य डॉ. गोविंद राजेनिंबाळकर, कोलकाता येथील एस.के.बी. विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. दीपक मंडल तसेच लडाख विद्यापीठाचे प्रा. डॉ. मोहम्मद शहनवाज यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. परिषदेत कला, वाणिज्य व विज्ञान शाखांतील संशोधकांनी शोधनिबंध सादर केले. समारोप सोहळ्यास प्रा. सुरेश रसाळ, प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, डॉ. राजेश शिर्के, प्रा. बाळकृष्ण महानोर यांच्यासह राज्यभरातील संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रवीण नागवडे व प्रा. कोमल कांबळे यांनी केले, तर आभार डॉ. संदीप कदम व डॉ. ज्ञानेश्वर कर्पे यांनी मानले.

---

## बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती गरजेची : कोळगे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**ढोरजळगांव :** स्त्रीभृण हत्या हुंडाबळी विधवा महिलांना रूढी व अंधश्रद्धेमुळे अनेक जाचक अटीना सामोरे जावे लागते.मुलींचा घटता जन्मदर त्यामुळे बालविवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असुन ते रोखण्यासाठी सामाजिक जनजागृतीची गरज असल्याचे आव्हाणेबु च्या उपसरपंच श्रीमती संगिता प्रताप कोळगे यांनी बोलताना सांगितले.

मुख्यमंत्री पंचायतराज अभियाना अंतर्गत आव्हाने बु ता शेवगाव येथे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम व ग्रामसभा संपन्न झाली त्यावेळी त्या बोलत होत्या.यावेळी बालविवाह रोखण्याची शपथ घेण्यात आली त्याचबरोबर गरोदर माता यांना पोषण आहाराचे वाटप स्त्रीजन्माचे स्वागत करण्यात आले वेगवेगळ्या विषयावरती महिलांची मनसोक्त चर्चा झाली गावामध्ये भविष्यकाळामध्ये बालविवाह होणार नाहीत त्याचबरोबर दरवर्षी श्री जन्माचे स्वागत ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात येईल गरोदर मातांना ही सकस आहाराचे वाटप करण्यात येईल असा ठराव करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे, ग्रामविकास अधिकारी अशोक नवले,आरोग्य सेविका, सौ भिसे मॅडम, मोहिनी धुमाळ ,पल्लवी चोथे, सुनिता आरेकर, सुरेखा माने ,शोभा ससाने, नंदा खैरे ,प्रमिला वाणी, नीलिमा जाधव, सुवर्णा मुटकुळे, गीता नाचन, सोनाली शिंपी, शुभांगी शिंपी, मयुरी दीक्षित ,निकिता धुमाळ, ज्योती डुरे, सविता दुधाळ ,अश्विनी खैरे ,दिपाली दिवटे, निवेदिता कोळगे,मंगल डुरे, आदीसह महिलांची मोठी उपस्थिती होती.मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत या ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये नाविन्यपूर्ण कार्यक्रम म्हणून १ एप्रिल २०२५ ते ८ मार्च २०२६ पर्यंत जन्मलेल्या सर्व मुलींचा यथोचित सन्मान करण्यात आला सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत कर्मचारी भारत कोळगे, गणेश डुरे ,योगेश चोथे, अस्लम पठाण, बन्सी वाघमारे, यांनी परिश्रम घेतले.

---

## सावित्रीबाई फुले स्मृतीदिनानिमित्त महिला सक्षमीकरण मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री





**नेवासा :** जागतिक महिला दिन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिनाचे औचित्य साधून नेवासाफाटा रोडवरील लक्ष्मी मंगल कार्यालयात आयोजित महिला सक्षमीकरण मेळाव्यास महिलांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या संकल्पनेतून आणि सौ. रत्नमालाताई लंघे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या मेळाव्यास धनश्रीताई विखे प्रमुख उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना धनश्रीताई विखे यांनी महिलांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता विविध क्षेत्रात काम करण्याच्या संधी शोधून स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन केले. प्रत्येक महिलेने स्वतःच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे तसेच समाजातील प्रत्येक क्षेत्रात आपली कर्तृत्वाची छाप उमटवावी, असेही त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील यांनी उपस्थित महिलांचे स्वागत करत प्रास्ताविक केले. महिलांच्या सबलीकरणासाठी विविध शासकीय योजनांचा लाभ अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या डॉ. तेजश्री नवले-लंघे यांनी महिला सक्षमीकरण, ॲड. सोनल वाखुरे यांनी कायदेविषयक तर पोलीस उपनिरीक्षक श्रद्धा वैद्य यांनी महिला संरक्षणाबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विविध क्षेत्रात कार्यरत कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. तसेच महिला बचत गटांना उद्योग व्यवसायासाठी साडेचार कोटी रुपयांचे धनादेश वितरित करण्यात आले.

दरम्यान, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील मित्र मंडळ व नेवासा पंचायत समिती आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित आरोग्य शिबिरात तज्ञ डॉक्टरांकडून महिलांची मोफत तपासणी करण्यात आली. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

---

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग

### जाब विचारणाऱ्या वडिलांना मारहाण, आरोपीवर पोस्को

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** तू मला फोन का केला नाही, तू मला खूप आवडतेस, असे म्हणत अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याचा प्रकार उघडकीस आला असून मुलीच्या वडिलांनी जाब विचारल्याने आरोपीने त्यांनाही मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील एका गावात घडली. या प्रकरणी आरोपी अरबाज अमीन शेख (रा. मानोरी, ता. राहुरी) याच्यावर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी अरबाज शेख हा एका इंग्रजी माध्यम शाळेच्या खासगी बसवर चालक म्हणून काम करतो. त्याने ९ वीमध्ये शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीला कागदावर मोबाईल क्रमांक देत फोन करण्यास सांगितले. मुलीने फोन न केल्याने आरोपीने तिला वारंवार त्रास देत तू मला खूप आवडतेस असे म्हणत धमकी दिली व तिचा विनयभंग केल्याचा आरोप आहे.

सदर प्रकार मुलीने आई-वडिलांना सांगितल्यानंतर ९ मार्च रोजी मुलीच्या वडिलांनी आरोपीला जाब विचारला. त्यावेळी आरोपीने शिवीगाळ करत त्यांना मारहाण केली. परिसरातील नागरिकांनी हस्तक्षेप करून मुलीच्या वडिलांची सुटका केली व आरोपीची धुलाई करून त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले.

या घटनेत मुलीचे वडील जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोस्को) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र जाधव करीत आहेत.

---

## ४ कोटींच्या खर्चातून आधुनिक महाविद्यालयीन इमारत : तनपुरे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** एकाच शिफ्टमध्ये कॉलेज भरवता यावे यासाठी नवीन अद्ययावत इमारत उभारण्यात येत असल्याची माहिती डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे यांनी दिली. या इमारतीच्या बांधकामाबाबत आपण अजितदादा यांना सांगितले होते आणि त्यांची मोठी मदत मिळाली, असेही त्यांनी नमूद केले. दुर्दैवाने ते आज आपल्यात नाहीत, मात्र त्यांच्या स्मरणार्थ स्मारक उभारण्यात येणार असल्याचेही तनपुरे यांनी सांगितले. सुमारे ४ कोटी रुपयांच्या या प्रकल्पातून १२०० विद्यार्थ्यांची क्षमता असलेली आधुनिक इमारत उभी राहणार असून, एआय (ख) कॉलेजसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

राहुरी कॉलेजची ही इमारत कमीत कमी कालावधीत पूर्ण करण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न असून विद्यार्थ्यांना व्यावसायिक आणि दर्जेदार शिक्षण मिळेल, असेही अरुण तनपुरे यांनी स्पष्ट केले.



राहुरी येथील लोकनेते रामदास पाटील धुमाळ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीचे वॉटरप्रूफिंग व वर्गखोल्यांच्या दुरुस्ती कामाचा शुभारंभ तसेच नवीन इमारतीचे भूमिपूजन सभापती अरुण तनपुरे यांच्या हस्ते काल मंगळवारी सकाळी करण्यात आले.

या कार्यक्रमास व्यासपीठावर नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, चाचा तनपुरे, हर्ष तनपुरे, भाऊसाहेब तमनर, गोरक्षनाथ पवार, रखमाजी जाधव, सपना भुजाडी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी गजानन सातभाई, अरुण साळवे, बाळासाहेब खुळे, ज्ञानेश्वर खुळे, सुनिल मोरे, प्रकाश भुजाडी, भास्कर ढोकळे, प्रतिक तनपुरे, नंदू तनपुरे, प्रशांत डौले, कृष्णा मुसमाडे, बाळासाहेब मुसमाडे, अरुण ठोकळे, चंद्रकांत पानसंबळ, भाऊसाहेब खेवरे, बबन गुलदगड, प्रमोद तारडे, भास्कर ढोकणे, आरीफ शेख, सोन्याबापू जगधने, गणेश गाडे, अरुण ढुस, अशोक तमनर, रवींद्र आहेर, प्रदीप भुजाडी, बाळासाहेब जाधव, सुरेश करपे आदी उपस्थित होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
बुधवार, दि.११ मार्च २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## घरासमोर खेळणाऱ्या चिमुकल्याच्या अपघातात मृत्यू



**वैजापूर :** अपघातात एका दोन वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना वैजापूर तालुक्यातील पुरणगाव शिवारात मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली. श्रेयांश अमोल ठोंबरे वय २ वर्षे राहणार पुरणगाव असे घटनेतील मयत चिमुकल्याचे नाव आहे. या घटनेबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार श्रेयांश हा पुरणगाव येथील आपल्या घरासमोर खेळत होता. दरम्यान तो रस्ता ओलांडत असताना भरधाव पीक अप वाहनाने त्याला जोरदार धडक दिली या अपघातात तो गंभीर जखमी झाला.उपस्थित नागरिकांनी व नातेवाईकांनी श्रेयांश याला तत्काळ वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र साडेपाच वाजेच्या सुमारास वैद्यकीय अधिकारी यांनी श्रेयांश याला तपासून मृत घोषित केले. अपघातानंतर धडक देणारे वाहन व चालकास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या घटनेची वीरगाव पोलिसांत नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलिस करीत आहे. दरम्यान या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



### जनतेच्या मनातील प्रचंड विश्वासाच्या जोरावर
## 'दादां'च्या एका इशाऱ्यावर लक्ष्मीनगर खाली

अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** एखाद्या नेत्या ने आदेश काढल्यावर त्यांचेवर प्रचंड विश्वास ठेवून एका रात्रीत आपली घरे मोडण्याची किमया शिर्डीतील लक्ष्मीनगर वासीयांनी केली असून शिर्डीकरांचा डॉ सुजय विखे यांच्या वर अपार विश्वास असल्याने हा न भूतो न भविष्यती चमत्कार सध्या शिर्डीत पहावयास मिळत आहे .

शिर्डी शहर झोपडपट्टी मुक्तीचा ध्यास उराशी बाळगुन मैदानात उतरलेले सुजयदादा शिर्डी करांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत . प्रचंड विकास कामांचा डोंगर उभा करण्यात विखे परिवाराचा हात अता पर्यंत कुणी धरला नाही आणि भविष्यात पण त्याची बरोबरी करू नये .

कुंभमेळ्याच्या धर्तीवर गेल्या अनेक वर्षांपासून रेंगाळत असलेला अतिक्रमित लक्ष्मी नगर चा प्रश्न मार्गी लागला . मुंबई, गुजरात दिल्ली एम पी युपी आदि राज्यातून नगर मनमाड रोडने शिर्डीत प्रवेश करताच डाव्या बाजूला असणाऱ्या लक्ष्मी नगर या झोपडपट्टी चे दर्शन होत असे लक्ष्मीनगरला मीनी धारावी अशी ही गणना होवू लागली.

एकीकडे सुवर्ण साई समाधी मंदीर बनत असताना त्याचे लगत असणारी झोपडपट्टी शिर्डी साठी भूषणावह नाही.

लक्ष्मी नगरमधे तत्कालीन ग्रामपंचायतने इंदिरा आवास योजनेचे ११० घरकुले देवून लक्ष्मी नगर वसवले होते याला ४० वर्षांचा काळ गेला. लोकसंख्या वाढली शिर्डी चा कायापालट झाला मात्र लक्ष्मी नगर जसे च्या तसेच राहीले.

चाळीस वर्षात एका कुटुंबाची चार कुटूंबे झाली. त्यामुळे ११० घरकुला व्यतिरिक्त आणखी लोकसंख्या वाढल्याने स्म शान भुमी पर्यत अनाधिकृत अतिक्रमण झाले. त्यामुळे तो परिसर अजून क्लेशदायक झाला.



आता या झोपडपट्टीत आपलाच मतदार राजा राहत असल्याने त्यांना दुखावन म्हणजे पायावर धोंडा पाडून घेणे. परंतू काळ बदलला , बदलत्या काळानुरूप आपण ही बदलले पाहिजे हा सुजय दादांचा मूलमंत्र लक्ष्मी नगर वासियांना पटला.

त्यासाठी विस्थापितांना वाऱ्यावर न सोडता त्यांना कनकुरी रोड लगत हक्काचा सात बारा उतारा देवून सर्व सुख सुविधांनी सुसज्ज पंचतारांकित झोपडपट्टी बसवण्याचा विडा सुजय दादांनी उचलला आणि त्याचे फलीत असे झाले की , दादांच्या एका शब्दावर ४० वर्षे ज्या छताने सावली दिली ते छत मनात कोणतीही किंतू परंतू न ठेवता एका इशाऱ्यावर जमीन दोस्त केले. विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी शासन दरबारी रेटा धरत कराडो अब्ज रुपयांची जागा गोर गरीबांना देणे हे राज्यातील पाहिलाच प्रयोग असल्याचे ते सांगतात, या निमित्ताने हा विश्वास आणि चमत्कार फक्त डॉ सुजय विखेच करू शकतात हे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## श्रीरामपूर नगरपरिषदेकडून थकबाकी कारवाईत १३ लाखांची वसुली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर नगरपरीषदेकडून थकबाकी रक्कमपोटी सहा मालमत्ता सील करण्याची कडक कार्यवाही करण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी दिली. या वसुलीपोटी पालिकेने काल १३ लाख रुपयाची वसुली केली आहे.

श्रीरामपूर नगरपरिषद क्षेत्रातील वारंवार भेटी व नोटीस, दूरध्वनी संपर्क, अधिपत्र देउन सुध्दा मालमत्ता कराचा भरणा करीत नसल्यामुळे श्रीरामपूर मुख्याधिकारी यांचे निर्देशानुसार कर विभाग मार्फत कराचा भरणा रू. ३२ लाख २२ हजार ४९७ रुपये या थकबाकी रकमेचा भरणा न केल्यामुळे दि.१० मार्च २०२६ रोजी सहा मालमत्ता सीलची कार्यवाही करण्यात आली आहे. तरी शहरातील सर्व नळ कनेक्शन धारक व मालमत्ता धारक यांनी लवकरात लवकर कर भरणा करून नगरपालिकेस सहकार्य करावे व होणारी कटू कार्यवाही टाळावी.आज १० मार्च रोजी १३ लाख रुपयेची वसुली झाली आहे.

श्रीरामपूर नगर परिषदेच्या वसुली विभागामार्फत शहरातील थकबाकीदारांवर वसुली पथकाने थकबाकी कामी व अधिपत्र बजावणी कामी सहा मालमत्ता सील करण्यात आल्या असुन त्यांच्याकडून ३२ लाख२२ हजार ४९७ रुपये थकीत असल्या मुळे सदरची कारवाई करण्यात आली सदरच्या कारवाईच्या वेळेस श्रीरामपूर नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी महेंद्र ताकपिरे, वसूल विभाग कर विभाग प्रमुख विकास घटकांबळे, वार्ड लिपीक- गोरख दौंडे , अशोक वाघ , अरुण तुपे, प्रविण ढुमने, योगेश प्रधान, सुभाष बाचकर,ईश्वर शेळके, नितीन पवार,गणेश गवळी, अमोल गायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, अजय गायकवाड, वैभव पंडागळे, रोहित भांबरे, राजेश थोरात, अमोल कांबळे ,विशाल चौधरी, शंभू छल्लारे ,किरण डोंगरे ,करण हिवाळे आदी कर्मचारी उपस्थित होते सदर कारवाई सर्व वार्डातील थकबाकी धारकांकडे वसुली कामी सदरचे पथक रोज फिरणार असून सर्व मालमत्ता धारकांनी आपल्याकडील घरपट्टी पाणीपट्टी गाळाभाडे थकबाकी रक्कम लवकरात लवकर भरून श्रीरामपूर नगर परिषदेस सहकार्य करावे अशी आवाहन श्रीरामपूर नगर परिषदेचे मुख्याधकारी मच्छिंद्र घोलप व नगराध्यक्ष करण ससाणे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

तसेच मार्च महिन्यामुळे नागरिकांना सुविधा म्हणून शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी देखील कर भरणा करण्यासाठी वसुली विभागाचे कार्यालय सुरु ठेवण्यात येणार आहे.

### श्रीरामपूर पोलिसांची तत्पर कारवाई
## अनधिकृत आर्थिक व्यवहारांवर आळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगांव :** परवानगी नसताना सुरू असलेल्या आर्थिक व्यवहारांवर श्रीरामपूर पोलिसांनी केलेल्या सतर्क कारवाईमुळे मोठा गैरव्यवहार उघडकीस येण्यापूर्वीच त्यावर आळा बसला आहे. या कारवाईमुळे 'प्रो-इलेक्ट्र' कंपनीच्या जाळ्यात अडकण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या अनेक नवीन गुंतवणूकदारांचे संभाव्य नुकसान टळले आहे.

अहमदनगर जिल्ह्यात यापूर्वीही अशा प्रकारच्या अनेक कंपन्यांनी नागरिकांची फसवणूक केल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे पोलिसांनी वेळेत हस्तक्षेप करत संबंधित आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण मिळवले.

पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही भुलथापांना बळी पडू नये आणि कोणत्याही गुंतवणुकीपूर्वी संबंधित संस्थेकडे अधिकृत परवाना आहे की नाही याची खात्री करावी. अल्पावधीत मोठ्या प्रमाणात परतावा देण्याचे आमिष दाखवून कोणी फसवणूक करत असल्याचा संशय आल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर यांनी केली. यामध्ये पोसई सतीश दौले , पोलीस उपनिरीक्षक दादाभाई मगरे तसेच पोलीस कर्मचारी दादासाहेब लोंढे, संदीप दरंदले, सहदेव चव्हाण, अशोक गाढे, दादासाहेब गुंड, अनिल शेंगाळे, पुजा भावसार, अरुण पवार आणि मीरा सरग यांनीही सहभाग घेतला.

या कारवाईमुळे नागरिकांमध्ये सम ाधान व्यक्त होत असून, भविष्यात अशा फसव्या गुंतवणूक योजनांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## जिल्ह्यात एलपीजी गॅसचे वितरण सुरळीत करा; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**शिर्डी :** अहिल्यानगर जिल्ह्यात एलपीजी गॅसच्या पुरवठ्यामध्ये नागरिकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील एलपीजी गॅस गोदामांची विशेष पथकामार्फत अचानक तपासणी करावी आणि कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

तसेच सामाजिक माध्यमावर फिरणाऱ्या टंचाई च्या मेसेज वर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील एलपीजी गॅस पुरवठ्याच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. या बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी एम. के. चौधरी, बीपीसीएल कंपनीचे कुमार मिश्रा यांच्या सह बीपीसीएल राजकुमार मिश्रा यांच्यासह संबंधित गॅस कंपन्यांचे प्रतिनिधी व गॅस वितरक उपस्थित होते.

सध्या जिल्ह्यात एलपीजी गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. ग्राहकांनी गॅस सिलिंडरसाठी ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी. नियमानुसार गॅस वितरण होत असल्याची खात्री करुन घ्यावी. तसेच, गॅसची ऑनलाईन नोंदणी करून अधिकृत गॅस एजन्सींनी गॅस सिलिंडरचा पुरवठा वेळेत व नियमानुसार करावा. वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखावी, तसेच ग्राहकांना वेळेत सेवा मिळेल यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने वितरण करावे. प्रशासनाने गॅस पुरवठा परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

## भंडारदरा शताब्दी महोत्सव पर्यटकांना आकर्षित करणारा ठरावा : ना. विखे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** भंडारदरा धरणाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात येणारा महोत्सव सांस्कृतिक आणि निसर्ग पर्यटनाला चालना देणारा ठरावा, तसेच स्थानिक कलाकारांना संधी आणि रोजगारनिर्मितीला प्राधान्य देत सर्वंकष कृती आराखडा तयार करावा, अशा सूचना जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

विधानभवनात झालेल्या बैठकीत भंडारदरा धरणाच्या शताब्दी महोत्सवासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्याचा आढावा घेण्यात आला. उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या या धरणाचे शताब्दी वर्ष साजरे करण्यासाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विशेष समिती स्थापन केली आहे. या महोत्सवासाठी जलसंपदा विभागाने तयार केलेला आराखडा अंतिम मंजुरीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर सादर केला जाणार असल्याची माहिती मंत्री विखे पाटील यांनी दिली.

भंडारदरा धरणामुळे जिल्ह्याच्या सामाजिक व आर्थिक विकासाला मोठी चालना मिळाली आहे. या शताब्दी वर्षानिमित्त धरण परिसराचे सुशोभीकरण करून पर्यटनविकासाला चालना देणे, प्रत्येक महिन्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे आणि स्थानिक लोककला व कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेटे, स्वप्निल काळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## पोलिसावर हल्ला करणाऱ्या आरोपींची शहरातून धिंड



**राहुरी :** आपली ड्युटी बजावत असलेल्या एका पोलिस कर्मचाऱ्यावर प्राणघातक हल्ला करणाऱ्या आरोपींची राहुरी पोलीस पथकाने चांगलीच ठेचून काढली. त्यानंतर दि. १० मार्च रोजी सायंकाळी आरोपींची शहरातील मुख्य रस्त्यावरून धिंड काढली. त्यामुळे खाकी वर हात टाकणाऱ्यांचे काय हाल होतात हे पोलिसांनी नागरिकांना दाखवून दिले आहे. यामुळे गुन्हेगारीवर नक्कीच वचक बसणार आहे.

दि. ८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ राहुरी तालुक्यातील नगर मनमाड महामार्गावर डिग्रस फाटा येथे १० ते १२ जण दारुच्या नशेत असताना चारचाकी वाहनाला कट लागल्याच्या कारणावरुन ट्रक चालकाला लाकडी दांडी व लाथा बूक्क्यांनी मारहाण करत होते. त्यावेळी राहुरी पोलिस ठाण्यातील पोलीस हवालदार विकास रंगनाथ वैराळ हे त्यांच्या चारचाकी वाहनातून नगरकडून राहुरीकडे येत असताना त्यांनी सदर प्रकार पाहिला. त्यावेळी त्यांनी सदर आरोपींना ट्रक चालकाला मारहाण करण्यास मज्जाव केला. त्यावेळी आरोपींनी त्यांना शिवीगाळ करून दमदाटी केली होती. त्यानंतर हवालदार विकास वैराळ हे रात्री ११.३० वाजे दरम्यान राहुरी शहरातील ग्रीन हॉटेल चौक येथे ड्युटी करत असताना तेच आरोपी तेथे आले. त्यांनी हवालदार विकास वैराळ यांना पून्हा विनाकारण शिवीगाळ केली. तसेच फायटर, लोखंडी गज, लाकडी दांडा व लाथा बूक्क्यांनी बेदम मारहाण केली होती. या बाबत राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी खंडु वसंत काळे, वैभव बाबासाहेब तारडे, संतोष अंकुश काळे, सर्व रा. बुरुडगाव, ता. जि. अहील्यानगर तसेच महेश निमसे व अनोळखी ११ इसम अशा एकुण १५ जणांवर विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस पथकाने आरोपी खंडु काळे, वैभव तारडे, संतोष काळे यांना ताब्यात घेऊन गजाआड केले. तर इतर आरोपी पसार झाले.

राहुरी पोलीस पथकाकडून आज दि. १० मार्च रोजी सायंकाळी ताब्यात असलेल्या आरोपींची शहरातील मुख्य रस्त्यावरून धिंड काढण्यात आली आणि घटनेचा तपास केला. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक समाधान फडोळ हे करीत आहे.

## व्यापाऱ्याचे अपहरण करणारी टोळी पोलिसांनी फिल्मी स्टाईलने पकडली
### दोन गावठी कट्टे व जिवंत काडतुसे जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** पुण्याजवळील पिंपरी-चिंचवड येथील एका व्यापाऱ्याचे खंडणीसाठी अपहरण करून पसार होणार्या उत्तर प्रदेशातील पाच अट्टल गुन्हेगारांच्या टोळीला संगमनेर तालुका पोलिस पथकाने हिवरगाव पावसा टोलनाका येथे फिल्मी स्टाईलने पकडा त्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत. या धडक कारवाईत पोलिसांनी दोन गावठी बनावटीचे कट्टे, सहा जिवंत काडतुसे आणि गुन्ह्यात वापरलेली कार असा एकूण ११ लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पिंपरी-चिंचवड येथील व्यापाऱ्याचे अपहरण करून गुन्हेगार काळ्या रंगाच्या स्विफ्ट कार (क्रमांक णझ-७०-क्ठ-९२७२) आळेफाटा मार्गे संगमनेरच्या दिशेने येत असल्याची गुप्त माहिती श्रीरामपूरचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांना एका खाबऱ्यामार्फत मिळाली त्यांनी ही माहिती तात्काळ संगमनेर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंके यांनी खांडगाव फाटा येथे सर्व बाजूने नाकेबंदी केली होती. रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास संशयित कार हिवरगाव पावसा टोल नाक्यावर येताच पोलिसांनी तिला




चहुबाजूंनी वेढले. पोलिसांना पाहून गुन्हेगार पळून जाण्याच्या तयारीत असताना संगमनेर तालुका पोलिस पथकाने सिनेस्टाईल पाठलाग करत त्यांना पकडले या टोळीविरुद्ध पिंपरी-चिंचवड येथील काळेवाडी पोलीस ठाण्यात विविध कलमाने गुन्हा दाखल करण्यात आला असून, सर्व गुन्हेगारांना पुढील तपासासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

### ■ या टोळीतील ५ जणांना केली अटक

चंद्रशेखर दीपकचंद्र गौड (वय ३४), दिलीप मोहनलाल सरोज (वय २८), रिंकू अलगुराम सरोज (वय १७), अनिल गिरीधारीलाल सरोज (वय २६) आणि मुकेशकुमार राममुदर चव्हाण (वय २४) हे पाच अपहरण कर्ते मिळून आले असून हे सर्व जण उत्तर प्रदेशातील प्रतापगड जिल्ह्या तील रहिवासी आहेत.त्यांच्या ताब्या तून घातक शस्त्रांसह मोबाईल आणि कार हस्तगत करण्यात आली आहे.

### ■ या पोलीस पथकाने केली धडक कारवाई

ही यशस्वी कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली बापूसाहेब हांडे, राहुल सारबंदे, सुनील ढाकणे, संतोष फड, शांताराम मालुंजकर तसेच संगमनेर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक विकास काळे, सोलोमन सातपुते, पोलीस कॉन्स्टेबल सचिन उगले, चालक झोडगे यांच्यासह हिवरगाव पावसा टोल नाका येथील मॅनेजर व कर्मचाऱ्यांनी या टोळीला पकडण्यात यश मिळवले.